रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९ । अंक ७३ । पृष्ठे ८ ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

रायगड, सोमवार, दि. १८ ऑगस्ट २०२५

# कृषीवल

किंमत ४ ₹

पाहिजेत
१. अकाऊंटंड क्लार्क
२. गार्डनसाठी महिला
३. किचन हेल्पर
४. रिसेप्शनसाठी व्यक्ती
अर्जासह समक्ष भेट
हॉटेल साईइन, चोंढी, अलिबाग-रेवस रोड, अलिबाग



(छायाचित्र : समीर मालोदे)

### पुरुषांमध्ये गावदेवी गोंधळपाडा विजयी

# मानाच्या हंडीत थरांचा विक्रम

। चौल । प्रतिनिधी ।
एक.. दोन.. तीन.. चार.., गोविंदा आला रे... अशा गगनभेदी घोषणांनी तयार झालेला माहोल... एकीकडे पावसाचा जोर, तर दुसरीकडे थरांवर थर धाडसी मानवी मनोरे रचत गोविंदांचा जोश शेतकरी कामगार पक्ष पुरोगामी युवक संघटना अलिबाग पुरस्कृत व प्रशांत नाईक मित्रमंडळ आयोजित दहीहंडी स्पर्धेत पाहायला मिळाला. अलिबागच्या या मानाच्या दहीहंडीचा हा उत्साह अन् जल्लोष मध्यरात्रीपर्यंत शिगेला पोहोचला होता. दरम्यान, दोन गोविंदा पथकांनी आठ थरांचे यशस्वी मनोरे रचून नवा विक्रम रचला आहे. या स्पर्धेत २८ पुरुष, तर २४ महिला गोविंदा पथकांनी सहभाग घेतलेल्या स्पर्धेला पावसाच्या सरींनी खऱ्या अर्थाने आणखी रंगत आणली. दरम्यान, अलिबागची ही मानाची दहीहंडी फोडण्याचा मान पुरुषांमध्ये गावदेवी गोंधळपाडा गोविंदा पथकाने, तर महिलांमध्ये पोहरादेवी शास्त्रीनगर-अलिबागच्या गोपिकांनी पटकाविला. दोन्ही विजेत्या गोविंदा पथकांना मानाची गदा आणि रोख रकमेचे पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

•➤ पान २ वर

(अधिकची क्षणचित्रे पान ८ वर)

### महिलांमध्ये पोहरादेवी गोविंदा पथक विजेते



### सलामी देणाऱ्यांचा सन्मान

महिला गोविंदा पथकाने चार थरांची सलामी दिल्यास पाच हजार रुपये व पाच थरांची सलामी देणाऱ्या गोविंदा पथकाला अकरा हजार रुपये बक्षीस ठेवण्यात आले होते. यामध्ये १३ महिला गोविंदा पथकांनी चार थरांचे मनोरे उभारून सलामी दिली असून, अकरा गोविंदा पथकांनी पाच थरांचे मानवी मनोरे उभारून सलामी दिली.

पुरुष गोविंदा पथकाने पाच थरांची सलामी दिल्यास पाच हजार रुपये व सहा थरांची सलामी दिल्यास अकरा हजारांचे बक्षीस होते. २० गोविंदा पथकांनी सहा थरांची, तर सात गोविंदा पथकांनी सहा थर लावून सलामी दिली. या गोविंदा पथकांना बक्षिसं देऊन गौरविण्यात आले.

### भाई जयंत पाटील यांच्याकडून शुभेच्छा



शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस भाई जयंत पाटील आणि रायगड जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष सुप्रिया पाटील यांनी या स्पर्धेला सदिच्छा भेट देऊन स्पर्धकांचा उत्साह वाढवून त्यांना शुभेच्छा दिल्या. दरम्यान, प्रशांत नाईक मित्रमंडळाकडून त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी जयंत पाटील यांनी या स्पर्धेने खऱ्या अर्थाने परंपरा जपल्याचे सांगत प्रशांत नाईक व संपूर्ण टीमचे कौतुक केले.

## रोह्यात आज पाणीपुरवठा बंद

। रोहा । प्रतिनिधी ।
रोहा अष्टमी नगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून जलवाहिनी व यंत्रणेच्या देखभाल दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आल्यामुळे मंगळवारी (दि.१९ ) रोहा अष्टमी शहारातील पाणीपुरवठा एक दिवस बंद राहणार आहे. तरी नागरिकांनी उपलब्ध पाण्याचा वापर काटकसरीने करुन नगरपालिका प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन मुख्याधिकारी अजयकुमार एडके यांनी केले आहे. डोलवहाल पाणीपुरवठा योजनेंतर्गत शहराला पाणीपुरवठा केला जात आहे. ३० वर्षांपासून या योजनेवर देखभाल दुरुस्तीच्या नावाने करोडो रुपये खर्च करण्यात आले आहे. ही योजना जुनी असल्यामुळे नगरपालिकेकडून वारंवार देखभाल दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आली आहेत. या शट डाऊनच्या दरम्यान सर्व दुरुस्तीचे कामे पूर्ण करण्यासाठी नगरपालिका प्रशासन अपार मेहनत घेते. याच धरतीवर रोह्यात मंगळवारी (दि. १९) संपूर्ण रोहा अष्टमी भागातील पाणीपुरवठा बंद असणार, अशी माहिती मुख्याधिकारी अजयकुमार एडके यांनी दिली.

### नवी मुंबई विमानतळाला दिबांच्या नावासाठी

# सरकारला डोंगरावरुन हाक

### ग्रामस्थांच्या आंदोलनाला महाविकास आघाडीचा पाठिंबा

। पनवेल । प्रतिनिधी ।
नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ ३० सप्टेंबरपर्यंत सुरू करण्यासाठी राज्य व केंद्र सरकारने कंबर कसली आहे. विमानतळ युद्धपातळीवर प्रकल्पात काम सुरू आहे. मात्र, सध्या या विमानतळ प्रकल्पासाठी ज्यांच्या जमिनी संपादित झाल्यात अशा प्रकल्पग्रस्तांचा एक गट मात्र आंदोलनाच्या पवित्र्यात असून, त्यांनी रविवारी पळस्पे ते जेएनपीटी या मार्गावरील नांदगाव टेकडीवर चढाई करून सरकारला हाक मारण्याचे अनोखे आंदोलन केले.




विमानतळाला दि.बा. पाटील यांचे नाव मिळावे, तसेच विमानतळात ज्यांच्या जमिनी संपादित झाल्या आहेत, त्यांच्या कुटुंबियांना विमानतळामध्ये रोजगार मिळावा आणि पुनर्वसन पॅकेज देताना केलेल्या आश्वासनांची पूर्तता करा, या तीन मुख्य मागण्यांसाठी प्रकल्पग्रस्त तरुण एकवटले होते. या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी महाविकास आघाडीचे नेते मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यामध्ये शेतकरी कामगार पक्षाच्यावतीने माजी आ. बाळाराम पाटील, शिवसेना(उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपनेते बबनदादा पाटील, माजी आमदार मनोहर भोईर, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्रजी पवार साहेब गट) महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष भावना घाणेकर, राजेंद्र पाटील, दहा गाव समिती अध्यक्ष नाथा पाटील, काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष सुदाम पाटील, सचिन केणी, विजय शिरढोणकर, विश्वास पेटकर, दिलीप पाटील, सुरेश पाटील, लिलाधर भोईर, ॲड. विक्रांत घरत, विजय शिरढोणकर, राहुल मोकळ, प्रदीप म्हात्रे, मोहन घरत, मच्छिंद्र घरत, किरण केणी महेंद्र मुंगाजी, कवी तारेकर, विवेक मोकळ, सुहास पाटील, रुपेश मोहिते, सुधाकर कोळी, पुंडलिक म्हात्रे, ॲड. प्रशांत भोईर, •➤ पान २ वर

**काम अंतिम टप्प्यात, नामांतर कधी?**
नवी मुंबई येथे होऊ घातलेल्या आंतरराष्ट्रीय विमानतळावर दि. २९ डिसेंबर २०२४ रोजी पहिले विमान उतरले. मात्र, विमान उतरले तरी अजूनपर्यंत विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांच्या नावाचे काय, असा प्रश्न प्रकल्पग्रस्त भूमीपुत्र विचारत आहेत. यासाठी विविध माध्यमांतून आतापर्यंत आंदोलने करुन झोपेचे सोंग घेतलेल्या सरकारला जागे करण्याचा प्रयत्न प्रकल्पग्रस्तांनी केला आहे. मात्र, अद्याप नामांतराबाबत सरकारने ठोस निर्णय घेतलेला नाही. आता विमानतळाचे कामही अंतिम टप्प्यात आले आहे.

## रेवदंडा आगरकोट किल्ल्यावर अपघात

### पुण्याच्या पर्यटक महिला गंभीर जखमी

। रेवदंडा । विशेष प्रतिनिधी ।
नागाव येथे गोविंदाच्या सुट्टीनिमित्त आलेले पुणे येथील एक विवाहित जोडपे रविवारी रेवदंडा येथील ऐतिहासिक आगरकोट किल्ला व प्रसिद्ध सातखणी बुरुज पाहण्यासाठी गेले होते. फिरून झाल्यावर बुरुजाजवळ ठेवलेली बॅग आणण्यासाठी गेल्याच क्षणी बुरुजाचा सिमेंटचा काही भाग अचानक कोसळून अबोली श्रीकांत देशपांडे (५३) यांच्या डोक्यावर आदळला. स्थानिक नागरिकांनी तातडीने त्यांना रेवदंडा प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. मात्र प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढे अलिबाग येथील रुग्णालयात हलवण्यात आले आहे.



या घटनेमुळे ऐतिहासिक वारशाच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. आगरकोट किल्ला व सातखणी बुरुज अत्यंत जीर्णावस्थेत असून, पर्यटकांच्या जीवाला सतत धोका निर्माण होत आहे. तातडीने स्ट्रक्चरल ऑडिट करून बुरुजांची दुरुस्ती करणे आवश्यक असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. या अपघातानंतर स्थानिक नागरिक व पर्यटकांमध्ये संताप व्यक्त होत असून, पुरातत्व विभाग, महसूल खाते व राज्य शासन जाणूनबुजून या किल्ल्याकडे दुर्लक्ष करत असल्याची चर्चा रंगली आहे. काहींच्या मते, आगरकोट किल्ल्याचे जतन न करता, त्याला नकाशावरून आणि गुगलवरून गायब करण्याचा डाव सरकारी अधिकाऱ्यांचा आहे.

## राज्यात ३१८ गोविंदा जखमी, दोघांचा मृत्यू

। मुंबई । प्रतिनिधी ।
महाराष्ट्रात दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. दरम्यान, मुंबईतील दहीहंडी उत्सवात तब्बल ३१८ गोविंदा जखमी झाले असून, २९४ जणांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे. सध्या २४ गोविंदांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तर, दोन गोविंदांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, मनोऱ्यावरुन पडल्याने हा मृत्यू झाला असून, एका गोविंदाचा मृत्यू काविळने झाला आहे. तर, दहीहंडीसाठी रोप बांधताना तोल गेल्याने खाली पडून दुसऱ्या गोविंदाला जीव गमवावा लागला.

मानखुर्दमध्ये एका गोविंदाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली होती. मानखुर्दच्या महाराष्ट्र नगर येथील ही दुर्घटना असून दहीहंडी रोप बांधताना तोल गेल्याने गोविंदाचा खाली पडून अपघात झाला. या दुर्घटनेनंतर जखमी अवस्थेतील गोविंदाला गोवंडीतील शताब्दी रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्यास मृत घोषित केले.

### ६,६०० कोटींची गुंतवणूक रायगडसह पालघर, सिंधुदुर्गात जागांची तपासणी

# राज्यात उभारणार शिपयार्ड क्लस्टर्स

। मुंबई । प्रतिनिधी ।
महाराष्ट्र समुद्री क्षेत्रात क्रांतिकारी पाऊल टाकत असून, राज्य सरकारने राज्याच्या सागरी विकासाला गती देण्यासाठी मोठा निर्णय घेतला आहे. राज्यात सहा ठिकाणी सागरी शिपयार्ड क्लस्टर्स उभारले जाणार असून, यासाठी अंदाजे ६,६०० कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. या प्रकल्पांमुळे २०३० पर्यंत सुमारे ४०,००० थेट व अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

तीन जागांची तपासणी...
महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड या क्षेत्रासाठी प्रमुख संस्था म्हणून काम करत असून, सध्या सहा संभाव्य किनारपट्टीच्या ठिकाणांची निवड करण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यात नंदगाव (पालघर), दिघी (रायगड) आणि विजयदुर्ग (सिंधुदुर्ग) या तीन ठिकाणांपैकी एका ठिकाणी शिपयार्ड क्लस्टर विकसित केला जाणार आहे. त्यासाठी लवकरच सखोल तांत्रिक आणि आर्थिक व्यवहार्यता अभ्यास करण्यासाठी सल्लागार नेमण्यात येणार आहे. महाराष्ट्र सरकारच्या या योजनेमुळे राज्यातील किनारपट्टीच्या विकासाला गती मिळेल, स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील आणि भारताला स्वदेशी जहाजबांधणी क्षेत्रात अधिक स्वावलंबी बनवण्याच्या दिशेने ही योजना महत्त्वपूर्ण ठरेल. •➤ पान २ वर



**प्रथम टप्प्यातील तीन शिपयार्ड क्लस्टर**
नंदगाव (पालघर): सर्वात मोठा प्रकल्प, २,६६६ एकर, दिघी (रायगड): २,५५० एकर विजयदुर्ग (सिंधुदुर्ग): १,३७१ एकर.

> हे क्लस्टर्स केवळ रोजगारनिर्मिती नाही, तर महाराष्ट्राच्या सागरी उद्योगाला जागतिक पातळीवर उभं करण्याचं पाऊल आहे. आम्ही जागतिक सर्वोत्तम प्रथा आत्मसात करत असून, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी हा आराखडा तयार करण्यात येत आहे.
> – प्रदीप पी., सीईओ, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड

## मुंबईत दरडीखाली दोघे गाडले

। मुंबई । प्रतिनिधी ।
मुंबईत गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे विक्रोळी पार्कसाईट येथील वर्षानगर डोंगराळ भागात असलेल्या जनकल्याण सोसायटीवर दरडीचा भाग कोसळला. या दरडीचा मलबा थेट एका घरावर जाऊन पडला. या दुर्घटनेत मिश्रा कुटुंबातील शालू मिश्रा (१९) आणि सुरेश मिश्रा (५०) यांचा जागीच मृत्यू झाला. तर आरती मिश्रा (४५) आणि ऋतुराज मिश्रा (२०) हे गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर राजावाडी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. वर्षानगरमधील हा डोंगराळ परिसर असून, दाट लोकवस्तीने भरलेला आहे. या भागात दरडीची दुर्घटना घडली.

## जम्मूत पावसाचे थैमान

- कठुआ जिल्ह्यातील ढगफुटीत चार जणांचा मृत्यू
- कोसळलेल्या दरडीत अनेकजण अडकल्याची भीती

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।
जम्मू-काश्मीरमध्ये पावसाने अक्षरशः थैमान घातले असून, कठुआ जिल्ह्यातील घाटी गाव आणि आसपासच्या परिसरात मुसळधार पावसाने आलेल्या पुरात चार जणांचा मृत्यू झाला असून, सहा जण जखमी झाले आहेत. अधिकाऱ्यांनी रविवारी ही माहिती दिली. याआधी किश्तवाड जिल्ह्यात ढगफुटीमुळे झालेल्या दुर्घटनेत ६० जणांचा बळी गेला होता, त्यापाठोपाठ ही दुसरी मोठी नैसर्गिक आपत्ती ओढवली आहे. रविवारी पहाटेच्या सुमारास कठुआतील जुठाना जोड परिसरात दरड कोसळून एक कुटुंब ढिगाऱ्याखाली गाडले गेल्याची भीती व्यक्त होत आहे. त्याचवेळी जिल्ह्यातील राजबाग परिसरातील दुर्गम घाटी गावात आणि जवळच्या दोन ठिकाणी ढगफुटीसदृश्य पाऊस झाला. यामुळे आलेल्या जलप्रलयामुळे या गावांचा संपर्क तुटला आहे. राजबाग पोलीस ठाण्याचे निरीक्षक अजय सिंह यांनी सांगितले, या घटना पहाटे ३.३० ते ४ च्या दरम्यान घडल्या. मदत आणि बचाव पथकांच्या तुकड्या घटनास्थळी पोहोचल्या आहेत.

पान १ वरुन

## मानाच्या हंडीत थरांचा विक्रम

शेतकरी कामागर पक्ष पुरोगामी युवक संघटना अलिबाग पुरस्कृत व प्रशांत नाईक मित्रमंडळ आयोजित दहीहंडी स्पर्धेत गतवर्षीचे विजेते गावदेवी गोंधळपाडा संघाने सलग दुसऱ्या वर्षीसुद्धा अलिबागची मानाची दहीहंडी सात थर लावून फोडण्याचा विक्रम केला आहे. पहिल्या प्रयत्नांत आठ थरांची सलामी देत उपस्थित प्रेक्षकांना रोमांचित केले. आतापर्यंत सात थरांचा विक्रम या दहीहंडी स्पर्धेत झाला होता. परंतु, यंदा मरीआई मेटपाडा गोविंदा पथकासह गावदेवी गोंधळपाडा पुरुष गोविंदा पथकांनी आठ थरांचा मनोरा उभारुन नवा विक्रम स्थापित केला आहे. उपस्थित प्रेक्षकांनी टाळ्या अन् शिट्ट्या वाजवून दोन्ही पथकांचे कौतुक केले. दरम्यान, गावदेवी गोंधळपाडा गोविंदा पथकाला १,३१,१११ रुपये व मानाची गदा, तर शास्त्रीनगर-अलिबागच्या पोहरादेवी गोविंदा महिला पथकाला ५१,१११ रुपये व मानाची गदा आणि अलिबाग नगरपरिषद हद्दीतील हे पथक असल्याने स्व. नमिता नाईक यांच्या स्मरणार्थ ठेवण्यात आलेल्या ५० हजारांचे अतिरिक्त पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

यावेळी अलिबागचे माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, शेकाप राज्य महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, शेकापचे जिल्हा सहचिटणीस ॲड. गौतम पाटील, द्वारकानाथ नाईक, प्रदीप नाईक, सतीश प्रधान, तालुका चिटणीस सुरेश घरत, अनिल चोपडा, निलम हजारे, कपिल अनुभवणे, आर्य पाटील यांच्यासह अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत विजेत्यांना पारितोषिक देण्यात आले.

या स्पर्धेला सायंकाळी चारनंतर खऱ्या अर्थाने रंगत चढत गेली. एक-एक करुन तब्बल २८ पुरुष आणि २४ महिला गोविंदा पथकांनी येऊन सलामी देण्याचा यशस्वी प्रयत्न केला. मागील दोन-तीन महिने रात्रीचा दिवस करुन मेहनत आणि जिद्दीच्या बळावर अलिबाग परिसर आणि तालुक्यातील सहभागी अनेक गोविंदा पथकांनी चार, पाच, सहा, सात थरांचे मानवी मनोरे उभारुन सलामी दिली. हजारो प्रेक्षकांच्या उपस्थितीत एक वेगळा जल्लोष, गोविंदा पथकांचा थरार या सलामीच्या माध्यमातून पहावयास मिळाला. प्रेक्षकांनी टाळ्यांच्या गजरात, शिट्ट्या वाजवत सर्वच पथकांच्या सलामीला दाद दिली.

**..अन् आसमंत दुमदुमला**

खेळ म्हटले की, नवे-नवे इतिहास रचले जातात. हा क्षण सुवर्णाक्षरात कोरण्यासाठी गोविंदांना आवश्यक असणारा पाठिंबा प्रशांत नाईक यांच्या काटेकोर नियोजन आणि मार्गदर्शनाखाली मित्रमंडळाने दिला. यामुळेच गोविंदांनी निडरपणे आपला पराक्रम सादर केल्याचे यावेळी सहभागी गोविंदा पथकांनी सांगितले. अलिबागमध्ये आठ थरांच्या विक्रमाला गोविंदा पथके गवसणी घालत असताना हजारो प्रेक्षकांनी तो थरार अनुभवला. थरावर थर रचत असताना प्रेक्षकांनी रोखून धरलेला श्वास आणि हंडी फोडताच जल्लोषाच्या आरोळ्यांनी सारा आसमंत दुमदुमून गेला होता. यावेळी उत्सवाचा मानबिंदू म्हणून गौरविण्यात आलेल्या प्रशांत नाईक यांना उत्कृष्ट आयोजन, नीटनेटक्या नियोजनाबद्दल सर्वांनी धन्यवाद दिले.

**मान्यवरांची स्पर्धेला भेट**

या दहीहंडी उत्सवावा अनेक वर्षांची परंपरा आहे. हा सोहळा दरवर्षी जल्लोषात साजरा केला जातो. यंदाच्या या उत्सावाला शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाध्यक्ष सुरेंद्र म्हात्रे, युवासेना जिल्हाध्यक्ष अमिर उर्फ पिंट्या ठाकूर यांच्यासह प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांनी भेट देऊन प्रशांत नाईक आणि मित्रमंडळाला शुभेच्छा दिल्या.

**नियोजनासाठी १६ पथके**

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रशांत नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली दोनशेहून अधिक सभासदांनी वेगवेगळी जबाबदारी चोखपणे सांभाळली. त्यासाठी जवळपास १६ विविध पथके तयार करण्यात आली होती. या सभासदांनी प्रथमोपचारापासून दिलेली वेगवेगळी जबाबदारी उत्तमपणे सांभाळून स्पर्धा यशस्वी करण्यात मोलाचा वाटा उचलला. यामध्ये महिला स्वयंसेवकांचेही एक वेगळे पथक याठिकाणी तैनात होते. शेकापच्या महिला व पुरुष कार्यकर्त्यांचाही मोठा सहभाग यामध्ये होता.

**लाखभरांनी घेतला घरबसल्या आनंद**

ज्यांना कार्यक्रमस्थळी येऊन स्पर्धेत प्रत्यक्ष सहभागी होणे शक्य नव्हते. त्यांच्यासाठी खास या स्पर्धेचे प्रो लिंकच्या या यूट्यू लाईव्हच्या माध्यमातून प्रक्षेपण करण्यात आले. त्यामुळे सव्वा लाखांहून अधिक प्रेक्षकांनी या उत्सवाचा थेट प्रक्षेपणाच्या माध्यमातून आनंद लुटला. या स्पर्धेत ३६ रिल्स स्पर्धकांनी सहभाग नोंदविला आहे.

**परंपरेला एक नवी उंची**

मरीआई मेटपाडा गोविंदा पथक आणि गावदेवी गोंधळपाडा गोविंदा पथकांनी अलिबागच्या मानाच्या दहीहंडी स्पर्धेच्या इतिहासात प्रथमच आठ थर रचल्याने स्पर्धेच्या परंपरेला एक नवी उंची मिळाली आहे. मेटपाडा गोविंदा पथकाने आठ थर यशस्वीपणे उभारले. या कामगिरीनंतर पथकाचे सर्वत्र कौतुक होत असून, अलिबागकरांसाठी ही दहीहंडी २०२५ची अविस्मरणीय आठवण ठरली आहे. कारण, एकाच स्पर्धेत दोन-दोन गोविंदा पथकांनी आठ थरांची सलामी दिली.

## सरकारला डोंगरावरुन हाक

सुनील म्हात्रे, रोशन पाटील कोपर, बाळा नाईक सरपंच, महेंद्र नाईक, प्रकाश नाईक, संदीप नाईक, प्रकाश डाऊर,विनायक पाटील, तानाजी तारेकर, मिलिंद तारेकर, सुशील तारेकर, गुरुनाथ तारेकर, प्रवीण मोकळ, अमित म्हात्रे, अजय तारेकर, वैभव म्हात्रे, विजय पाटील, राम पाटील, प्रल्हाद केणी, अनिल पाटील, कुमार पाटील, वैभव पाटील, संदीप केणी संजय अं. पाटील संजय गं. पाटील, मिलिंद घरत,दिलीप मुंडकर,अनिल पाटील सरपंच, वाघीवली सर्व ग्रामस्थ,समीर मुंडकर, सुहास पाटील,दिलखुष केणी, अतिश पाटील, संतोष गावंड, जगदीश केणी, रोहिदास गोंधळी, जितेंद्र मुंडकर. नंदकुमार मुंडकर, निखिल भोपी, नितेश पाटील, संजय पाटील, राहुल केणी, प्रवीण केणी, भूपेंद्र केणी, सूरज केणी, धीरज केणी, विजय केणी, धीरज परदेशी, बळीराम पाटील, राम पवार, राजाराम पाटील, विक्रांत घरत,सचिन केणी, सुधाकर कोळी, प्रदीप म्हात्रे, मच्छिंद्र घरत, किरण केणी, मोहन घरत आदींसह परिसरातील हजारो ग्रामस्थ सहभागी झाले होते.

## राज्यात उभारणार शिपयार्ड क्लस्टर्स

**राज्याचे उद्दिष्ट काय?**

राज्य सरकारचा उद्देश महाराष्ट्राला 'सागरी उद्योगातील जागतिक हब' म्हणून विकसित करणे आहे. या क्लस्टरद्वारे देशांतर्गत जहाजबांधणी, निर्यातक्षम दुरुस्ती सेवा, रिसायकलिंग व तंत्रज्ञानावर आधारित सहवर्ती उद्योगांना चालना मिळणार आहे. प्रथम क्लस्टरच्या यशानुसार इतर पाच ठिकाणांवर विकास हळूहळू सुरू केला जाईल.या क्लस्टरमध्ये जहाजबांधणी, दुरुस्ती, रिसायकलिंग आणि संलग्न सेवा यांचा समावेश असेल. राज्य सरकारने यासाठी एप्रिल २०२५ मध्ये ''शिपबिल्डिंग, शिप रिपेअर आणि शिप रिसायकलिंग धोरण'' जाहीर केले आहे.

**'शिपबिल्डिंग, शिप रिपेअर आणि रिसायकलिंग धोरण २०२५' ची वैशिष्ट्ये**

एप्रिल २०२५ मध्ये राज्य मंत्रिमंडळाने मंजूर केलेल्या या धोरणांतर्गत उद्योगांसाठी खालील प्रोत्साहन दिले जाणार आहे:१५ टक्के भांडवली अनुदान (प्रकल्प खर्चावर आधारित)प्रकल्पाला १ कोटी रुपयांपर्यंत कौशल्य विकासासाठी मदतसंशोधन आणि नवकल्पनांसाठी २५ कोटी रुपयांचे सहाय्य३० वर्षांसाठी भाडेपट्टीवर जमीन (नूतनीकरणयोग्य) अनुमती, परवाने व प्रशासकीय सहाय्यासाठी 'सिंगल विंडो सुविधा'.

**सल्लागारांची नेमणूक आणि कार्यक्षेत्र**

लवकरच एक सल्लागार संस्था नेमली जाणार असून तिच्या जबाबदाऱ्या पुढीलप्रमाणे असतील:संभाव्य ठिकाणांचा सखोल तांत्रिक व आर्थिक व्यवहार्यता अभ्यास इंजिनीअरिंग डिझाइन व पायाभूत सुविधांची मांडणीपर्यावरण व सामाजिक प्रभाव मूल्यांकन राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय मानकांनुसार नियोजनजोखमींचा अंदाज व त्यावर उपाययोजना.

# शाडूच्या मूर्तींना वाढती मागणी

## मूर्तिकारांची अंतिम लगबग सुरू

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन तालुक्यात बुधवारी (दि. २७) रोजी बाप्पा विराजमान होत असून, तालुक्यातील एकतीस लहान-मोठ्या गणपती कारखान्यातून मूर्तिकारांची लगबग सुरू झाली आहे.तालुक्यात एकूण आठ हजार आठशे अठरा गणेशमूर्ती विराजमान होत आहेत. एकंदरीत, पारंपरिक शाडूच्या मूर्तींना मागणी चांगली असून, प्लास्टर ऑफ पॅरिस मूर्त्यांची मागणी काहीशी घटली आहे.

एक फुटाच्या मूर्तीपासून चार फूट उंचीच्या मूर्तीची प्रतिष्ठापना बुधवारी ( दि. २७) रोजी करण्यात येणार आहे. येथे अद्यापही शाडू मातीपासून तयार करण्यात येणाऱ्या हाती मूर्तींना चांगली मागणी आहे. गणपती कारखान्यांमधून जवळपास नव्वद टक्के शाडूच्या मूर्ती, तर दहा टक्के प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींची मागणी भाविकांकडून करण्यात आली आहे. मूर्ती सुकण्यास यावेळी योग्य वातावरण असल्याने मूर्तीकारांनी समाधान व्यक्त केले आहे.



शाडू माती, रंग साहित्याच्या दरात झालेली वाढ यामुळे मूर्तींच्या खरेदी दरात काही टक्क्यांनी वाढ झाली आहे. मूर्तिकामासाठी अपुरे मनुष्यबळ, त्यातच तालुक्यात विजेचा लपंडाव आणि सलग तीन महिने महावितरणकडून येणारे वाढीव वीज बिल या कारणास्तव मूर्तीकारांनी नाराजी व्यक्त केली आहे.

> आमचा चार पिढ्यांपासून गणपती कारखाना आहे. तरुण पिढीने गणपती कारखान्याकडे लक्ष केंद्रित करायला हवं. आत्ताच्या पिढीने या व्यवसायाकडे पाठ फिरवली आहे. त्यामुळे पिढ्यान्पिढ्या हाती शाडूच्या मूर्ती घडवणारे गणपती कारखाने भविष्यात बंद होण्याच्या मार्गावर आहेत, याची खंत वाटते. हातची कला जोपासायला हवी.
> – उमेश आमले, मूर्तिकार

# उपराष्ट्रपतीपदासाठी सी.पी. राधाकृष्णन यांना उमेदवारी

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांना एनडीएकडून उपराष्ट्रपतीपदाची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. रविवार, दि. १७ ऑगस्ट रोजी नवी दिल्लीत झालेल्या बैठकीत जे.पी. नड्डा यांनी केली घोषणा केली. या बैठकीस पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाहांसह अन्य वरिष्ठ नेते उपस्थित होते.

पत्रकार परिषदेत बोलताना जे.पी. नड्डा म्हणाले की, आम्ही विरोधी पक्षांशीही संवाद साधू. उपराष्ट्रपतीपदासाठी बिनविरोध निवडणूक व्हावी यासाठी आम्हाला त्यांचा पाठिंबाही मिळाला पाहिजे. आम्ही आधी म्हटल्याप्रमाणे, आम्ही त्यांच्या संपर्कात आहोत आणि आमच्या वरिष्ठ नेत्यांनी यापूर्वीही त्यांच्याशी संपर्क साधला आहे आणि आताही आम्ही त्यांच्या संपर्कात राहू. आमच्या सर्व एनडीए मित्रपक्षांनी आम्हाला पाठिंबा दिला आहे. सी.पी. राधाकृष्णन हे उपराष्ट्रपतीपदासाठी आमचे एनडीए उमेदवार आहेत. उपराष्ट्रपतीपदाची निवडणूक ९ सप्टेंबरला होणार असून, अर्ज भरण्याची अंतिम तारीख २२ ऑगस्ट आहे. माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखर यांनी प्रकृतीच्या कारणास्तव राजीनामा दिल्याने उपराष्ट्रपती पदासाठी निवडणूक होणार आहे.

## जयवंती गोंधळींचा सन्मान

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

'सलाम हिंदुस्थान' या कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून वाशी-नवी मुंबई येथे सन्मान करण्यात आला. कॅप्टन मनोज भामरे आणि गायक अशोक डिका यांच्या हस्ते समाजहिताचे काम करणाऱ्या सत्कारमूर्तींचा गौरव करण्यात आला. यात स्त्री हक्क चळवळीतील सामाजिक कार्यकर्त्या जयवंती गोंधळी यांचे महिलांच्या चळवळीसाठी विशेष योगदान असल्यामुळे त्यांना गौरविण्यात आले. त्यांनी महिलांच्या अनेक प्रश्नांना वाचा फोडली आहे. या कार्यक्रमात मान्यवरांबरोबर अनेक नागरिक उपस्थित होते.

## प्रभाकर उभारे यांचे निधन

**| माणगाव | प्रतिनिधी |**

माणगाव तालुका पंचायत समितीचे माजी सभापती प्रभाकर बाळाराम उभारे यांचे दीर्घ आजाराने रविवार, दि. १७ ऑगस्ट रोजी सकाळी ४ वा. पुणे येथे दीर्घ आजाराने निधन झाले. मृत्यूसमई त्यांचे वय ७० वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन लहान भाऊ,चार बहिणी, एक मुलगा, एक मुलगी, जावई, सून, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने उभारे कुटुंबियांबरोबरच मित्रपरिवार व माणगावकरांवर शोककळा पसरली आहे.



रविवारी पहाटे पुणे येथील रुग्णालयात औषोधोपचार सुरु असताना त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनाची माहिती माणगावात सर्वत्र समजताच विविध क्षेत्रातील मंडळींनी, मित्रपरिवार तसेच नातेवाईकांनी त्यांच्या माणगाव येथील निवासस्थानी धाव घेतली. रविवारी दुपारी त्यांचा पार्थिव माणगावात त्यांच्या निवासस्थानी आणल्यावर अनेकांनी त्यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेतले. त्यांच्यावर माणगावयेथील स्मशानभूमीत सायंकाळी ४.३० वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी अंत्यसंस्काराला मोठा जनसमुदाय उपस्थित होता. कै. प्रभाकर उभारे यांचा दशक्रिया विधी व उत्तरकार्य विधी दोन्ही एकाच दिवशी मंगळवार, दि.२६ ऑगस्ट रोजी राहत्या घरी माणगाव येथे होणार असल्याचे त्यांचे बंधू रत्नाकर उभारे यांनी सांगितले.

## पादचारी पुलाची दुरवस्था

**पनवेल :** खांदा वसाहत ते नवीन पनवेलला जोडणारा सिडको प्रशासनाचा पादचारी पुलाच्या भिंतीला तडा गेला आहे. परंतु, त्याच्याकडे लक्ष द्यायला संबंधित प्रशासनास वेळ नसल्याने नागरिकांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे. या पुलाच्या लाद्या निखळून पडल्या असून, दोन्ही बाजूने गवताची दाट वाढ झाली आहे. पुलाच्या भिंतींना तडे गेल्याने मोठा अपघात होण्याची शक्यता आहे. कारण पुलाच्या खालून मध्य कोकण रेल्वे मार्ग गेला आहे. त्यामुळे याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. विशेष म्हणजे, रात्रीच्या वेळी या पुलावरील लाइट्स बंद असल्याने अंधारात नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

# मनातली खदखद उतरली कागदावर



■ (छायाचित्र : धम्मशील सावंत)

■ पालीतील दुर्लक्षित गंभीर समस्या निबंधात

■ सर्वेश गुरवने पटकाविले प्रथम पारितोषिक

**| पाली/बेणसे | प्रतिनिधी |**

अष्टविनायक तीर्थक्षेत्र पाली शहराला विविध समस्यांनी ग्रासले आहे. या दुर्लक्षित समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी आयोजित केलेल्या निबंध स्पर्धेचा निकाल नुकताच जाहीर झाला. या स्पर्धेत सर्वेश गुरव या तरुणाने अतिशय निर्भीड व वास्तव मांडणी करून प्रथम पारितोषिक पटकावले.

या स्पर्धेत संकेत खंडागळे यांनी द्वितीय क्रमांक व गौसखान पठाण यांनी तृतीय क्रमांक पटकवला. विजेत्या स्पर्धकांना रोख रक्कम व प्रशस्तीपत्र देण्यात आले. तर संजय लखीमळे, कशमीरा गुप्ते, वर्षा हुले, मुस्तफा शेख व विजय ठोंबरे यांना सहभाग प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. सर्वच स्पर्धकांनी अतिशय वास्तव, निर्भीड व प्रभावी मांडणी केली होती. यातून त्यांच्या मनातील खदखद व असंतोष स्पष्ट दिसत होता. यावेळी ॲड. नरेश शिंदे, कपिल पाटील, अमित निंबाळकर, गौसखान पठाण, स्वप्नील खंडागळे, मंगेश लखीमळे, राजेश मपारा, आलाप मेहता, ललित ठोंबरे, प्रदीप गोळे, नंदू कुडपणे, सागर मोरे व सुराज गुरव आदींसह स्पर्धक उपस्थित होते.

### गांधीगिरीचा मार्ग

**पालीतील गंभीर व दुर्लक्षित समस्या सुटाव्यात यासाठी पालीतील नागरिक तसेच पाली सुधागड संघर्ष या संस्थेच्या माध्यमातून अनेक तक्रारी, निवेदने, निदर्शने, आंदोलने व वरिष्ठ पातळीवरील पाठपुरावा करण्यात आला. मात्र, प्रशासन व लोकप्रतिनिधी यांनी त्यांच्या मागण्यांना केराची टोपली दाखविल्याने संस्थेने अखेर नागरिकांकडूनच निबंधाच्या माध्यमातून या समस्या व विषयाला वाचा फोडण्याचा प्रयत्न असून, यासाठी निबंध स्पर्धेचे आयोजन केले आहे.**

## भिकू धाडवे यांचे निधन

**माणगाव :** माणगाव तालुक्यातील मूठवलीतर्फे निजामपूर गावचे रहिवासी तथा पाणसई ग्रामपंचायतीचे माजी सरपंच भिकूशेठ तुकाराम धाडवे यांचे शनिवार, दि. १६ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६.३० वाजता हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. मृत्यूसमयी ते ५९ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मोठा भाऊ, एक बहीण, तीन मुलगे, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने धाडवे कुटुंबियांवर शोककळा पसरली आहे. त्यांच्या पार्थिवावर मूठवलीतर्फे निजामपूर येथील स्मशानभूमीत रविवार, दि.१७ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कै. भिकूशेठ धाडवे यांचा दशक्रिया विधी सोमवार, दि.२५ ऑगस्ट रोजी तर उत्तरकार्य विधी (बारावे) मंगळवार, दि. २६ ऑगस्ट रोजी राहत्या घरी मूठवली तर्फे निजामपूर येथे होणार आहेत.



## मुरूडमध्ये जोरदार पाऊस

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

मुरुड शहरात गेले चार दिवस पावासाच्या जोरदार बॅटिंगमुळे नागरिकांचा धुवा उडाला आसुन मार्केट मध्ये सामसूम पाहायला मिळत आहे. बुधवारपासून गेले चार दिवसांपासून २९६ मिमी पाऊस पडला, अशी माहिती मुरुड तहसील कार्यालयाकडून संदेश वाळंज यांनी दिली. एकीकडे गणेशोत्सवाची लगबग सुरु असतानाच पावसाचा असाच जोर राहिला तर नक्कीच व्यावसायिकांची चिंता वाढणार आहे. सतत जोरदार पावसामुळे धरणे, विहिरी, धबधबे वाहू लागले आहेत. नगरपरिषदेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक सचिन बच्छाव यांच्या उत्तम नियोजनामुळे शहरातील रस्त्यांवर पाणी साचलेले पाहायला मिळले नाही.



# जी.एम.वेदक महाविद्यालयात रॅगिंगविरोधी दिवस साजरा

**| तळा | प्रतिनिधी |**

तळा शहरातील जी.एम. वेदक विज्ञान महाविद्यालयामध्ये रॅगिंग विरोधी समितीच्या वतीने रॅगिंग विरोधी दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन रॅगिंग विरोधी समितीप्रमुख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्राचार्य डॉ. एस.एस. मिर्झा यांनी विद्यार्थ्यांना रॅगिंगचे दुष्परिणाम समजावून सांगत, सुसंस्कृत आणि सुरक्षित शिक्षण पर्यावरण निर्माण करण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमास अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. ए.व्ही. राणे यांनी विद्यार्थ्यांना कायद्याची माहिती दिली व रॅगिंगविरोधातील महत्त्वाच्या उपाययोजना स्पष्ट केल्या. यावेळी विद्यार्थ्यांनी रॅगिंगविरोधात सामूहिक शपथ घेतली आणि जनजागृतीवर फलकांनी परिसर सजवण्यात आला होता.

रॅगिंग हा गंभीर प्रश्न आहे. महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेण्यासाठी येणाऱ्या वेगवेगळ्या भागातील विद्यार्थ्यांवर रॅगिंग करून त्यांचे शारीरिक व मानसिक शोषण करण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे अनेकवेळा पीडित विद्यार्थी, विद्यार्थिनी आत्महत्या करून त्यांचे जीवनमान संपवण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे महाविद्यालयाच्या वतीने हा जनजागृती उपक्रम राबविण्यात आला. यावेळी प्रा. संदीप राठोड यांनी आभार व्यक्त केले.


### जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक सौ. स्मिता संजय खाडे व श्री. अकरम अली खान निगाजी यांच्याकडुन कायमचे खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**बिनशेती जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे गौरकामत, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं ७१/९ एकुण ०.०४.७० गुंठे विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हित संबध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हित संबध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनाक १८/०८/२०२५

**ॲड. देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता. कर्जत, रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८



### ग्रामपंचायत दहिवली/गोवेले
### ता. माणगाव, जि रायगड
### निविदा सूचना

ग्रामपंचायत दहिवली/गोवेले खालील कामाकरिता जास्तीत जास्त नोंदणीकृत, इच्छित ठेकेदाराकडून लिफाफा पद्धतीने मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव/वस्तूचे नाव | काम पूर्ण करावयाचा कालावधी | निविदा सादर करणेचा अंतिम तारीख | वेळ | ठिकाण | कोरे निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत हद्दीतील मागासवर्गीय वस्तीला स्पीकर सेट पुरविणे. | ६ महिने | २१/०८/२०२५ | स. १०.०० वा.पर्यंत | ग्रा.पं.कार्यालय | २००/- |
| २ | ग्रामपंचायतीकरिता हायड्रोलिक चेअर खरेदी करणे | ६ महिने | २१/०८/२०२५ | स. १०.०० वा पर्यंत | ग्रा. पं. कार्यालय | २००/- |
| ३ | ग्रामपंचायतीकरिता स्वच्छताविषयक साहित्य खरेदी करणे | ६ महिने | २१/०८/२०२५ | स. १०.०० वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | २००/- |
| ४ | ग्रामपंचायतीकरिता स्पीकर खरेदी करणे | ६ महिने | २१/०८/२०२५ | स. १०.०० वा पर्यंत | ग्रा.पं.कार्यालय | २००/- |
| ५ | पाणी शुद्धीकरण साहित्य पुरविणे | ६ महिने | २१/०८/२०२५ | स. १०.०० वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | २००/- |

**अटी व शर्ती**

१) प्राप्त निविदा दि. २२/०३/२०२५ रोजी स. ठीक ११.०० वाजता ग्रा.पं. दहिवली/गोवेले येथे सरपंचांच्या समक्ष उघडणेत येईल.
२) कोणतेही एक अथवा अनेक निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा अधिकार सरपंच देगाव यांनी राखून ठेवला आहे.
३) प्रत्येक देयाकाकडून शासन नियमाप्रमाणे रकमा कपात केल्या जातील. मा. उपअभियंता सो.बांधकाम उपविभाग माणगाव यांचेकडील तांत्रिक अधिकारी व पं.स. माणगाव बांधकाम अभियंता तसेच ग्रा.पं.चे सरपंच यांचे मार्गदर्शन व देखरेखीखाली सदर काम करणेचे असून, काम समाधानकारक नसेल तर त्याच स्थितीत थांबून कार्यारंभ आदेश रद्द करणेचा अधिकार ग्रा.पं.ने राखून ठेवला आहे.
४) काम अंतिमरित्या पूर्ण झाल्यानंतर ६ महिन्यानंतर कामाची स्थिती पाहून कपात केलेली सुरक्षा अनामत परत केली जाईल.
५) नोंदणीकृत ठेकेदार उपलब्ध न झाल्यास स्थानिक ठेकेदारांच्या निविदांचा विचार केला जाईल.

**सही/-**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपचायत दहिवली/गोवेले**
**ता.माणगांव जि. रायगड**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रामपचायत दहिवली/गोवेले**
**ता. माणगांव जि.रायगड**



### ग्रुप ग्रामपंचायत देगाव
### ता. माणगाव, जि रायगड
### निविदा सूचना

ग्रुप ग्रामपंचायत देगाव खालील कामाकरिता जास्तीत जास्त नोंदणीकृत, इच्छित ठेकेदाराकडून लिफाफा पद्धतीने मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र | कामाचे नाव/वस्तूचे नाव | अंदाजपत्रक रक्कम | काम पूर्ण करावयाचा कालावधी | निविदा सादर करणेचा अंतिम तारीख | वेळ | ठिकाण | १%इसारा रक्कम | कोरे निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत हद्दीतील सर्व मागासवर्गीय वस्त्यांना सोलर लाईट बसविणे | ९८३२५/- | ६ महिने | २१/०८/२०२५ | स.१०.००वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ९८० | २००/- |
| २ | रिळे पाचोळे स्मशानभूमी दुरुस्ती करणे | ५.०० लक्ष | ६ महिने | २१/०८/२०२५ | स.१०.००वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ५०००/- | २००/- |
| ३ | ग्रामपंचायत हद्दीतील अंगणवाड्यांना फिल्टर पुरविणे | ५४००० | ६ महिने | २१/०८/२०२५ | स.१०.००वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ५४०/- | २००/- |
| ४ | ग्रामपंचायत कार्यालयाकरिता कपाट खरेदी करणे | २००००/- | ६ महिने | २१/०८/२०२५ | स.१०.००वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | २००/- | २००/- |
| ५ | पाणी शुद्धीकरण साहित्य पुरविणे | ६६०००/- | ६ महिने | २१/०८/२०२५ | स.१०.००वा पर्यंत | ग्रा.पं. कार्यालय | ६६० | २००/- |

**अटी व शर्ती**

१) प्राप्त निविदा दि. २२/०३/२०२५ रोजी स. ठीक ११.०० वाजता ग्रा. पं. देगाव येथे सरपंचांच्या समक्ष उघडणेत येईल.
२) कोणतेही एक अथवा अनेक निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा अधिकार सरपंच देगाव यांनी राखून ठेवला आहे.
३) प्रत्येक देयाकाकडून शासन नियमाप्रमाणे रकमा कपात केल्या जातील. मा. उपअभियंता सो. बांधकाम उपविभाग माणगांव यांचेकडील तांत्रिक अधिकारी व पं.स. माणगाव बांधकाम अभियंता तसेच ग्रा.पं.चे सरपंच यांचे मार्गदर्शन व देखरेखीखाली सदर काम करणेचे असून काम समाधानकारक नसेल तर त्याच स्थितीत थांबून कार्यारंभ आदेश रद्द करणेचा अधिकार ग्रा.पं.ने राखून ठेवला आहे.
४) काम अंतिमरित्य पूर्ण झाल्यानंतर ६ महिन्यानंतर कामाची स्थिती पाहून कपात केलेली सुरक्षा अनामत परत केली जाईल.
५) नोंदणीकृत ठेकेदार उपलब्ध न झाल्यास स्थानिक ठेकेदारांच्या निविदांचा विचार केला जाईल.

**सही/-**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत देगांव**
**ता. माणगाव, जि. रायगड**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपचायत देगांव**
**ता. माणगाव, जि. रायगड**

# गोविंदा रे गोपाळा...



● (छायाचित्रः संतोष रांजणकर)

## मुरुड बाजारपेठेत दहीहंडीचा थरार

। मुरुड । प्रतिनिधी ।

मुरुड तालुक्यातील किते भंडारी समाजाच्यावतीने श्रीकालभैरव मंदिरात भव्य अश्वारूढ मुर्तीची प्रतिष्ठापना दर वर्षी करण्यात येते. मुरुड भंडारवाडा येथील श्रीकालभैरव मंदिरात गेली दिडशे वर्षांहून अधिक काळ ही परंपरा भंडारी समाज बांधव जोपासत आहेत. श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या सात दिवस आधी या मुर्तीची स्थापना करण्यात येते. व दहीहंडीच्या दिवशी सर्व हंड्या फोडल्यानंतर रात्री विसर्जन करण्यात येते.

दरम्यान, मुरुडमध्ये शिवसेना (उद्धव ठाकरे) शहर शाखेतर्फे हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृती प्रित्यर्थ मुरुड बाजारपेठेत गेली पंधरा वर्षे खास महिलांसाठी मानाची दहीहंडी बांधण्यात येते. ही दहीहंडी यंदाही श्रीकाळभैरव गोविंदा पथकाने फोडून मानाचे चषक पटकावले.



● रोहा येथील कुंडलिका नदी संवर्धन पार्किंग मैदानात दहीहंडी उत्सव साजरा करण्यात आला. यावेळी जिल्ह्यातील ६२ गोविंदा पथकांनी सहभाग नोंदविला. या स्पर्धेत श्री वाकेश्वर गावदेवी गोविंदा पथक किल्ला व जय भवानी रोठखुर्द गोविंदा पथकाने सर्वाधिक ८ मानवी मनोरे रचत मुख्यहंडीचे पारितोषिक पटकावले.




● उरण तालुक्यात श्रीकृष्ण जन्माष्टमी आणि दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. दहीहंडीमध्ये एक व्यक्ती दुसऱ्यावर चढून मानवी थर तयार करतात आणि हंडी फोडतात. मात्र, चिरनेर गावात ग्रीस लावलेल्या मल्लखांब दहीहंडीचा थरार पाहण्यासाठी नागरिकांनी विशेष गर्दी केली होती.



● उरण तालुक्यातील टाकीगावात राधाकृष्ण मंदिरात कृष्ण श्रीकृष्ण जन्माष्टमीचे आयोजन करण्यात आले होते. तर चिरनेर गावात कातळपाडा, मधीलपाडा, मुळपाडा, रांजणपाडा, कुंभारपाडा, तेलीपाडा या पाड्यांमध्ये दहीहंडीचा उत्साह दिसून आला.




अलिबाग तालुक्यातील बहिरोळे येथे श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या निमित्ताने श्रीकृष्ण भक्तांनी व बाळगोपाळांनी ढोल-ताशांच्या गजरासह पारंपरिक गीतांच्या ठेक्यावर गल्लोगल्ली जाऊन दहीहंड्या फोडल्या. यावेळी सर्वांमध्ये एकच उत्साह पाहायला मिळत होता.



● तळा तालुक्यात पारंपरिक पद्धतीने जल्लोषात दहीकाला उत्सव साजरा करण्यात आला. बाळगोपालांसह ज्येष्ठ नागरिक देखील आनंदाने दहीकाला उत्सवात सहभागी झाले होते. यावेळी पारंपरिक पद्धतीने खालुबाजाच्या ठेक्यावर बाळ गोविंदांसह मोठ्यांपर्यत सर्वांनी फळी धरून खालुबाजावर ठेका धरला होता.



● रोह्यात पारंपारिक पद्धतीने गोकुळाष्टमीचा सण उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शहरातील तीन्ही प्रमुख आळ्यांमधुन गोविंदा निघाला. दुपारनंतर एकामागुन एक असे ठरलेल्या क्रमाने हे गोविंदा रोहा बाजारपेठेत आले. त्यानंतर येथील उंच दहीहंड्या फोडण्यात आल्या. हे क्षण पाहण्यासाठी नागरिकांनी बाजार पेठेत मोठी गर्दी केलेली होती.



● पोलादपूर शहरातील श्रीकाळ भैरवनाथ देवस्थान उत्सव मंडळातर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही खासगी आणि सार्वजनिक दहीहंड्या फोडण्याचे एक नियमबद्ध नियोजन करण्यात आले होते. या नियोजनानुसारच शहरातील २५ दहीहंड्या फोडण्याची संधी शहरातील १३ नगरांना देण्यात आली होती.



● महाड तालुक्यासह शहरात 'अरे बोल बजरंग बली की जय'च्या जयघोषात आणि वरुण राजाच्या साक्षिने संपूर्ण दहीहंडी उत्सव प्रचंड उत्साहात व तेवढ्याच जल्लोशात पार पडला.



● नागोठणे येथील पाटणसईसह वाकण येथे गोपाळकाळा उत्सव साजरा करण्यात आला. येथीलगोविंदा पथकाने सुमारे ८० वर्षांपासुन आजपर्यंत आपली परंपरा, नावलौकीक व आकर्षण टिकवुन ठेवले आहे.



● उलव्यात शनिवारी दहिहंडीचा थरार पाहायला मिळाला. सेक्टर १८ येथे यमुना सामाजिक शैक्षणिक संस्था शेलघर, रायगड जिल्हा काँग्रेस कमिटी आणि उरण विधानसभा युवक काँग्रेसच्यावतीने दहिहंडीचे आयोजन करण्यात आले होते. काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांच्यातर्फे ५ लाख ५५ हजार ५०० रुपयांची बक्षिसे दहिहंडीसाठी होती.



● महाड तालुक्यातील खुटिल मुळगाव येथे दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. या उत्सवाचे खास वैशिष्ट्य म्हणजे मुंबई, पुणे व महाड येथून युवक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या गावाची परंपरा पुढे चालू ठेवण्याचे काम करत आहेत.



## दहीहंडी फोडण्यासाठी हायटेंशन ड्रामा

। पेण । प्रतिनिधी ।

पेण तालुक्यात ललीत पाटील मित्र मंडळाचा गेली दोन दक्षके भरघोस बक्षिस लावून दहीहंडी उत्सव साजरा केला जातो. यंदा या मित्र मंडळाच्या स्पर्धेत अनेक गोविंदा पथकांनी सहभाग घेतला होता. नियमांचे काटेकोर पालन करून ललीत पाटील मित्र मंडळाने शेवटी चार गोविंदा पथकांमध्ये बक्षिसांची रक्कम विभागून दिली. तर, वैकुंठ पाटील मित्र मंडळाने ग्रामिण गोविंदा पथकांना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टिने हमरापूर, वाशी नाका, वडखळ या तीन ठिकाणी दहीहंडी स्पर्धेचे आयोजन केले होते. हमरापूर येथे विठाई खारपाले यांनी मानाचा हंडीच्या मान पटकला. तर, वाशी नाका येथे रुद्रावतार गोविंद पथक म्हैसबाड खारपाले, जय हनुमान गोविंदा पथक कोलेटी, विठाबाई गोविंदा पथक खारपाले, श्री राम गडब माचेला, नवेगाव या पाच गोविंदा पथकाने सात थरांची सलामी देउन स्पर्धेत चुरस निर्माण केली होती शेवटी आयोजकांनी पाचही जणांना बक्षिस विभागून दिले. वडखळ येथील दही हंडी जय हनुमान गोविंदा कोलेटी पथकाने पटकावला.



● गोकुळाष्टमीचे औचित्य साधून अलिबागमधील गोंधळपाडा शाळेच्या मैदानात दहीहंडी उत्सव साजरा करण्यात आला.



● अलिबाग तालुक्यातील चोंढी पंचक्रोशीत श्रीकृष्ण जन्माष्टमी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी चोंढी येथे प्राप्ती गायकवाड या लहान मुलीने दहीहंडी फोडली.

# भारताला दिलासा नाही

डोनाल्ड ट्रम्प आणि व्लादिमिर पुतीन यांच्यात अलास्का इथे झालेली बैठक काहीही निर्णय न होता संपली आहे. ही बैठक भारतासाठी अतिशय महत्वाची होती. तिच्यात काही तोडगा निघाला असता तर अमेरिकेने भारतावर लादलेले पन्नास टक्के आयातशुल्क थोडेफार कमी झाले असते. भारत रशियाकडून तेल आयात करतो, तो पैसा रशिया युक्रेन युध्दासाठी वापरतो, सबब आम्ही भारतावर जादा दंड व कर लादत आहोत असे ट्रम्प यांनी जाहीर केले होते. पुतीन यांच्यासोबत युक्रेन युध्दाबाबत थोडा जरी समझोता झाला असता तर भारताला उसंत मिळाली असती. पण ती मिळण्याची शक्यता दुरावली आहे आता रशियाशी समझोता होईपर्यंत भारतावरचा अतिरिक्त २५ टक्के कर स्थगित राहील असे कदाचित ट्रम्प म्हणतील. पण टांगती तलवार कायम राहील. भारताची अर्थव्यवस्था मेलेली आहे, भारताला व रशियाला दोघांना मिळून काहीही काशी करू दे असे वाह्यात उद्गारही ट्रम्प यांनी काढले. पण हा सर्व दबावतंत्राचा भाग असतो हे सगळ्या जगाला एव्हाना कळून चुकले आहे. कारण जे ट्रम्प रशियाच्या नावाने थयथयाट करीत होते व रशियाला मोठी किंमत चुकवावी लागेल असा इशारा देत होते तेच चार दिवसात पुतीन यांच्यासोबत शिखर बैठकीला तयार झाले. त्यानुसार शुक्रवारी अलास्का इथे ही भेट झाली. अलास्का हा आर्क्टिक समुद्राजवळचा उत्तर ध्रुवाजवळचा बर्फाळ वाळवंटी प्रदेश असून अमेरिकेने १८६७ मध्ये रशियाकडून तो खरेदी केला होता. या परिसरात अमेरिकेला तोवर काहीही थारा नव्हता. अलिकडे याच प्रदेशातील आणखी एक देश आईसलँड विकत घेण्याचा प्रस्ताव देऊन ट्रम्प यांनी खळबळ उडवली होती. अलास्कातील बैठकीविषयी अपेक्षा खूप होत्या तसेच तिच्यातून काही फार साध्य होणार नाही असे म्हणणारेही खूप होते. पण ट्रम्प व पुतीन यांची भेट झाली हेच अनेक अर्थांनी महत्वाचे होते. युक्रेनचे युध्द बंद करण्याबाबत काही तोडगा निघू शकला नसला तरी पुन्हा आम्ही लवकरच भेटू असे ट्रम्प म्हणाले आहेत.

### भारताच्या खांद्यावर बंदूक

युक्रेनवर रशियाने हल्ला केल्याला आता साडेतीन वर्षे झाली आहेत. या काळात बऱ्याच उलटसुलट गोष्टी घडल्या आरंभी बायडेन अध्यक्ष असेपर्यंत अमेरिकेने युक्रेनला बरीच मदत केली. युरोपातील देशही टनावारी बॉंब, विमाने आणि पैसे युक्रेनला देत आहेत. किंबहुना, युरोपीय देशांना रशियाला लष्करीदृष्ट्या वेढायचे आहे व युक्रेन हा त्याचा हस्तक झाला आहे असे पुतीन यांचे म्हणणे आहे. म्हणूनच रशियाच्या संरक्षणासाठी आपण युक्रेनवर हल्ला केला असे त्यांचे स्पष्टीकरण आहे. ट्रम्प यांनी जानेवारीमध्ये सत्तेत येताक्षणी युक्रेनची मदत बंद केली. जगातली युध्दे अमेरिकेच्या पैशाने लढली जातात व अमेरिकी नागरिकांना त्याचा भुर्दंड बसतो असा ट्रम्प यांचा दावा आहे. आपण सत्तेवर येताच ही युध्दे बंद करू असा प्रचार त्यांनी केला व त्याच्या आधारे ते निवडून आले. त्यामुळे युक्रेनची मदत त्यांनी थांबवली. युक्रेनचे अध्यक्ष झेलेन्स्की वॉशिंग्टनमध्ये भेटीसाठी आले असता त्यांचा जाहीर अपमान केला. हे युध्द बंद करून टाका असा दम त्यांना भरला. मधल्या काळात रशियाने युक्रेनचा वीस टक्के भूप्रदेश कबजात घेतला आहे. आता युक्रेनने त्यावर पाणी सोडावे व युध्दबंदी करावी असे ट्रम्प यांचे म्हणणे आहे. झेलेन्स्कीना अर्थातच ते मान्य नाही. परिणामी मध्यंतरी अमेरिकेने त्यांची लष्करी मदत बंद केली. आपण पुतीन यांच्या बाजूने बोललो की पुतीन युध्द थांबवतील असे ट्रम्प यांना वाटत होते. पण तसे घडले नाही. त्यामुळे अलिकडे पुन्हा त्यांनी युक्रेनला मदत सुरू करू असे जाहीर केले. तिकडे इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी यांनी युक्रेनचा पाठिंबा चालू होता. पण अमेरिकेच्या साह्याशिवाय हा पाठिंबा लंगडा होता. पण पुन्हा युध्दात उतरणे हे ट्रम्प यांच्या प्रतिमेसाठी हानिकारक आहे. त्यामुळे त्यांनी पुतीन यांना मनवणे चालू ठेवले. ते मानत नाहीत हे लक्षात येताच भारताच्या खांद्यावर बंदूक ठेवली. भारत एकूण आयातीपैकी २५ टक्के तेलाची आयात रशियाकडून करू लागला आहे. रशियाला मिळणारा हा पैसा बंद केला तर त्याचे तोंड उघडता येईल असा ट्रम्प यांचा होरा होता. तो योग्य होता.

### प्रत्युत्तर न दिल्याचे परिणाम

पण पुतीन हे केजीबी या रशियन गुप्तहेर संघटनेच्या तालमीत तयार झालेले खतरनाक खिलाडी आहेत. त्यांनी ट्रम्प यांची भेट घेतली. पण फार ताकास तूर लावू दिली नाही. २०२२ मध्ये ट्रम्प सत्तेत असते तर मुळात युध्द सुरू झालेच नसते असे म्हणून त्यांनी ट्रम्प यांना खूष केले. आपण जगात शांतता निर्माण करीत आहोत व युध्दे थांबवत आहोत असा प्रचार करायला ट्रम्प यांना आवडते. शांततेचे नोबेल मिळवायचे अशी त्यांची महत्वाकांक्षा आहे. युक्रेनवरचा रशियाचा हक्क अमेरिका मान्य करीत असेल तर पुतीन यांची इतर कशालाच हरकत नाही. नरेंद्र मोदी यांनी यापासून थोडा धडा घ्यायला हरकत नाही. ट्रम्प यांनी वारंवार इतका अपमान करूनही मोदी त्यांना प्रत्युत्तर देऊ शकलेले नाहीत. एवीतेवी असलाच मान खाली घालण्याचा पवित्रा घ्यायचाच होता तर पूर्वीच थोडी मुत्सदी भाषा केली असती तर हे सर्व टळले असते. त्याऐवजी भारत व पाकिस्तान यांच्यातील युध्द थांबवण्याची ट्रम्प यांचीही इच्छा होती व त्यांनीही प्रयत्न केले इतकेच मोदींनी तेव्हा म्हटले असते तरी भागले असते. ५० टक्के आयातशुल्क वगैरे लागू झाले नसते. आता तर मोदी सप्टेंबरात अमेरिकेला जाणार असल्याची चर्चा आहे. एकीकडे रशियाचे पुतीन भारतात येणार, मोदी चीनला जाणार असे म्हणत असतानाच अमेरिकेशी जुळवून घेण्याचे प्रयत्नही जोरदार आहेत. काल स्वातंत्र्यदिनाला मोदींनी शेतकऱ्यांच्या रक्षणाची भाषा केली. पण अमेरिकेच्या आयातकरावर थेट टीका केली नाही. पाकिस्तानवर नाव घेऊन हल्ला केला पण अमेरिका आपली कोंडी करीत असल्याचा अप्रत्यक्ष देखील उल्लेख झाला नाही. पाकिस्तानच्या दहशतवादाला इशारा देऊन झाला, पण त्याच पाकिस्तानला अमेरिका पाठिंबा देत असल्याबद्दल एक शब्दही मोदींनी उच्चारला नाही. अमेरिकेचा पुतीनसोबत काहीतरी तोडगा निघेल व परस्पर आपल्यावरचे संकट टळेल असे मोदींना वाटत होते. ते झालेले नाही. आता बहुदा ट्रम्पचे म्हणणे या ना त्या मार्गाने मान्य करूनच काही ना काही तडजोड करावी लागेल अशी शक्यता आहे. मोदी एरवी देशभक्तीच्या, ५६ इंची छातीच्या आणि विश्वगुरु असल्याच्या कितीही बाता करीत असले तरी अमेरिकेने भांडण काढताच ते गप्प बसले अशीच इतिहासात नोंद होईल. अलास्कामधून काहीच दिलासा मिळाला नसल्याने मोदी सरकारची आणखीनच कोंडी झाली आहे.

विचार

# कोपलेला हिमालय, निसर्गप्रकोप थांबवायचे आव्हान

***निसर्गाचे एक चक्र असते. त्याचे संतुलन महत्वाचे असते. त्याच्याशी छेडछाड करण्याचा प्रयत्न केल्यास निसर्ग जोरदार तडाखा देतो. हिमालयात गेल्या काही वर्षात घडलेल्या ढगफुटी, हिमनद्या वितळणे, मोठे पूर, भूस्खलन अशा घटनांतून निसर्गाने आपले रौद्र रुप दाखवून दिले आहे. केवळ हवामान बदलावर या घटनांचे खापर फोडून मोकळे होता येणार नाही, तर माणसाने नैसर्गिक संतुलन राखण्याचे आव्हान आता तरी पेलले पाहिजे.***



मिलिंद बेंडाळे

अलिकडेच उत्तराखंड राज्यात घडलेल्या घटनेमुळे निसर्गाचे संतुलन बिघडवण्यास हातभार लावणाऱ्यांनी डोळे उघडायला हवेत. केदारनाथच्या जोशी मठात झालेल्या घटनेची ही पुनरावृत्ती होती. अवघ्या ३७ सेकंदात इकडचे जग तिकडे होते. गावेच्या गावे वाहून जातात. माणसे, इमारती नाहीशा होतात यामागे काय कारणे आहेत आणि हिमालय किती धोकादायक आहे, याचा अभ्यास करायला हवा. भारतीय शास्त्रज्ञांनी हिमालयातील ५० हिमनदी तलावांना 'अत्यंत धोकादायक' म्हणून संबोधले आहे. २०१३ मध्ये केदारनाथ येथे किंवा गेल्या वर्षी सिक्कीममध्ये घडलेल्या घटनांप्रमाणे मोठ्या प्रमाणात हिमनदी तलाव फुटून पूर येण्याची शक्यता आहे. आता तर अशा आणखी ३२४ तलावांना 'अत्यंत धोकादायक' म्हणून वर्गीकृत केले गेले आहे. सिक्कीममधील दक्षिण ल्होनाक, हिमाचल प्रदेशातील समदर तापू आणि लडाखमधील काही तलाव हे उच्च ते अत्यंत धोकादायक क्षमतेच्या जलस्रोतांमध्ये आहेत. रोपार येथील 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी'तील संशोधकांनी मूळ हिमनदीशी थेट जोडलेले ८५१ हिमनदी तलाव ओळखले, त्यापैकी ५५० हून अधिक मध्यम (१९८), उच्च (३२४) आणि अत्यंत उच्च (५०) धोका निर्माण करतात. ते २३२ चौरस किलोमीटर क्षेत्रात पसरले आहेत. हे तलाव भारतात तसेच चीन (तिबेट स्वायत्त प्रदेश), भूतान आणि नेपाळसारख्या इतर हिमालयीन देशांमध्ये आहेत. उंच पर्वतीय प्रदेशांमध्ये वाढते तापमान, हिमनद्यांचे विघटन आणि हिमनदी तलावांच्या उद्रेकामुळे येणारे पूर हे चिंतेचे एक प्रमुख कारण बनले आहे.

वाढती लोकसंख्या आणि सामाजिक-आर्थिक विकास उपक्रमांमुळे या नाजूक पर्वतीय वातावरणाला आणखी अस्थिर केले आहे. त्यामुळे हिमनद्यांच्या तलावांचा उद्रेक वाढला आहे. २०१३ मधील चोराबारी तलावाचा उद्रेक किंवा गेल्या वर्षी दक्षिण लोनाक तलावामुळे आलेल्या पुरामुळे गंभीर नुकसान झाले होते. अशा तलावांची असुरक्षितता निश्चित करण्यासाठी रीत कमल तिवारी, अंकित त्यागी आणि दीपाली गायकवाड या त्रिकूटाने त्यांच्या भौगोलिक वैशिष्ट्यांचे परीक्षण केले. त्यांनी भूतकाळातील अशा पुरांच्या वारंवार समोर येणाऱ्या कारणांचा अभ्यास करून अहवाल दिला. त्यात १२ निष्कर्ष काढले. विश्लेषणातून दिसून आले की उच्च-धोकादायक तलावांची संख्या भारतात शंभर, त्यानंतर नेपाळमध्ये ५२ आणि भूतानमध्ये पन्नास इतकी आहे. 'खूप जास्त धोका' म्हणून वर्गीकृत केलेल्या तलावांमध्ये सामान्यतः सर्वात मोठे तलाव आणि हिमनदी क्षेत्र असते. 'रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन्स: सोसायटी अँड एन्व्हायर्नमेंट' या जर्नलमध्ये त्यांचा हा अहवाल प्रसिद्ध झाला आहे. मध्य हिमालयात (१५१ तलाव), त्यानंतर पूर्वेकडील (१४८) आणि पश्चिमेकडील प्रदेशामध्ये (७०) उच्च-जोखीम असलेले तलाव मोठ्या प्रमाणात आहेत. अभ्यासानुसार, जम्मू आणि काश्मीर आणि लडाखमध्ये सर्वाधिक (६२) तलाव आहेत. त्यानंतर सिक्कीम (१७) आणि अरुणाचल प्रदेश (१२) आहेत.

राष्ट्रीय हरित न्यायाधीकरणाने केंद्रीय जल आयोगाच्या अहवालाची दखल घेत केंद्र सरकार आणि काही इतर संस्थांना नोटिसा पाठवल्या. त्यात ६७ हिमनदी तलावांच्या क्षेत्रात चाळीस टक्के विस्तार झाल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे त्यांना उच्च जोखीम श्रेणीत टाकण्यात आले आहे. तसेच सिक्कीम सरकारने राज्यातील ४० उच्च जोखीम असलेल्या हिमनदी तलावांच्या परिस्थितीचे मूल्यांकन करण्यासाठी त्यांची चौथी आणि शेवटची मोहीम पूर्ण केली. हिमालयाच्या विविध भागांमध्ये येणारे महापूर मुख्यतः त्या प्रदेशाची भौगोलिक वैशिष्ट्ये आणि बदलांमुळे प्रत्ययाला येतात तर पश्चिम किनारपट्टीवर आणि मध्य भारतात येणारे महापूर पाण्याच्या प्रवाहावर परिणाम करणाऱ्या विविध घटकांमुळे येतात, असा निष्कर्ष भारतीय तंत्रज्ञान संस्थे (आयआयटी) च्या अभ्यासकांनी केलेल्या संशोधनात काढण्यात आला आहे. देशाच्या विविध भागांमध्ये येणाऱ्या महापुरांच्या कारणांचा अभ्यास केल्यानंतर संशोधकांनी काही महत्त्वाची निरीक्षणे नोंदवली आहेत. देशात येणाऱ्या तीन चतुर्थांश महापुरांना अतिरिक्त पावसामुळे आणि अलीकडील काळात जोरदार पावसामुळे जमिनीत निर्माण झालेल्या ओलसर स्थितीमुळे चालना मिळते, असे 'एपीजे नॅचरल हॅजार्डस' या नियतकालिकात प्रकाशित झालेल्या अभ्यासात म्हटले आहे. उर्वरित एक चतुर्थांश महापूर जास्तीच्या पावसामुळे होतात, असेही त्यात नमूद करण्यात आले आहे.

भारतीय हवामान विभागाच्या माहितीनुसार, नैसर्गिक बदलांचा हवामानावर होणारा परिणाम अत्यंत स्थानिक स्वरूपाचा असतो. म्हणजेच तो कमी क्षेत्रफळावर परिणाम करतो. पावसाची सुरुवात होऊन पूर येण्याचा कालावधी फारच कमी, साधारणतः सहा तासांच्या आत असतो. पूरस्थितीच्या विश्लेषणातील एक महत्त्वाचा निष्कर्ष असा आहे की जे खोरे पूर्वी महापुरांसाठी संवेदनशील नव्हते, तिथेही आता अतिरिक्त पावसाच्या घटना अधिक आणि वारंवार घडत आहेत. वातावरणातील उष्णता वाढत असून त्यामुळे भविष्यात महापुराचे नवे 'हॉटस्पॉट' निर्माण होऊ शकतात. अभ्यासात वर्णन केलेल्या नकाशामध्ये सध्या महापुराच्या दृष्टीने कमी संवेदनशील असलेल्या उपखोऱ्यांमध्ये उद्‌भवणारा धोकादेखील अधोरेखित करण्यात आला आहे. महापुरांचे हॉटस्पॉट मुख्यतः हिमालय, पश्चिम किनारपट्टी आणि मध्य भारतात केंद्रित आहेत. यामध्ये हिमालयात पृथ्वीच्या पृष्ठभागाच्या भौतिक वैशिष्ट्ये आणि बदल तर पश्चिम किनाऱ्यावर आणि मध्य भारतात जलवैज्ञानिक घटक हे महापुरांना कारणीभूत ठरतात, असे अभ्यासकांनी नमूद केले. अतिरिक्त पर्जन्य आणि आधीपासूनच ओलसर जमिनीच्या स्थितीच्या एकत्र परिणामामुळे जवळपास तीन चतुर्थांश महापूर उद्भवतात तर उर्वरित सुमारे एक चतुर्थांश महापूर केवळ जास्त पावसामुळे येतात. या अभ्यासात १९८१ ते २०२० दरम्यान भारतीय हवामान विभागाने नोंदवलेल्या तापमानविषयक नोंदी आणि 'इमर्जन्सी इव्हेंट्स डाटाबेस' यासारख्या विविध 'डाटाबेस'मधील महापुरांचे नोंदवलेले घटक आदी गोष्टींचे विश्लेषण केले आहे.

हिमालय हे केवळ पर्वताचे नाव नाही. ही पर्वतरांग समाजाची प्रातिनिधिक एकक आहे. हिमालयात जाणे म्हणजे केवळ गूढता आणि साहसाच्या जगात प्रवेश करणे नाही. हिमालय हे जीवनाच्या गूढतेसारखे एक न सुटलेले कोडे आहे. ते आपल्या जीवनाच्या प्रत्येक वळणावर एका महत्त्वाच्या प्रश्नासारखे उपस्थित आहे. अदम्य आकर्षण, साहस आणि प्रणय हे हिमालयाच्या अनेक गुणांपैकी एक आहेत; परंतु या प्रतिमेच्या पलीकडेही अनेक शीर्षके आहेत. रुडयार्ड किपलिंग म्हणतात त्याप्रमाणे हिमालयाच्या कुशीत जाणे हे आईच्या कुशीत जाण्यासारखे आहे; पण हा हिमालयाचा फक्त एक पैलू आहे. निसर्गाने निर्माण केलेले सौंदर्य आणि मानवाच्या आधुनिक काम गिरीतील सुसंवाद बिघडला आहे. मानव आणि निसर्गातील नाजूक आणि गोड नाते तुटत आहे. प्रदूषणाच्या वेदनेने ओरडणारे पर्वत, बाजाराच्या भीतीने थरथरणारी जंगले, आकुंचन पावणाऱ्या हिमनद्यांमुळे अंतिम श्वास घेणाऱ्या नद्या ही हिमालयाची नवी ओळख बनत आहे. आपण विकासाच्या साखळ्या हिमालयाला बांधल्या आहेत. त्याची जंगले, नद्या, झाडे, वनस्पती, फुले, फळे, पाने, मुळे, पक्षी, मासे, फुलपाखरे हे सर्व आपल्या बंदिवासात आहेत. आपण नैसर्गिक व्यवस्थेला आव्हान देत आहोत. आपण निसर्गाला एका चाचणी नळीत ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. परिस्थिती अशी आहे की ढग आणि पाऊस आता वरदान राहिलेले नाही, तर शापासारखे पर्वतांना घाबरवत आहेत. यामुळे हिमालयाचे अस्तित्व डळमळीत होत आहे.

आता आपण विकास आणि पर्यावरण यांच्यातील संतुलनाची मूक भिंतही तोडली आहे. विकासाच्या नवीन परिभाषेत, नदी म्हणजे जलविद्युत प्रकल्प आणि पर्वत म्हणजे पर्यटन असे समिकरण तयार होत आहे. विकासाच्या नावाखाली आपण नद्या आणि पर्वतांचा विस्तार बोगद्यांमध्ये बंद करत आहोत. उत्तराखंडमध्येही असेच घडले, ज्याची बीजे आपण जाणूनबुजून किंवा नकळत पेरली होती. आपण स्वीकारलेले विकासाचे मॉडेल प्रत्यक्षात हिमालयाच्या शोषणाचे मॉडेल आहे.

चर्चा आजची

# युवावर्गावर आर्थिक स्वातंत्र्य उंचावण्याची जबाबदारी

सुयोग आंग्रे

स्वातंत्र्याच्या ७८ वर्षांच्या प्रवासात भारताने बरीच चढ-उतार पाहिली आहे. हा प्रवास केवळ राजकीय स्वातंत्र्याचा नाही तर आत्मविश्वास, आत्मविश्वास आणि आत्मविश्वास देखील आहे. आता आम्ही २०४७ मध्ये विकसित भारत होण्याचे स्वप्न पाहत आहोत, मग हे समजून घेणे आवश्यक आहे की 'राष्ट्र प्रथम' चा संकल्प आपल्याला त्या सुवर्ण युगातील ध्येयापर्यंत पोहोचवेल का? आगामी येणारी २१ वर्षे भारताला आर्थिक आणि तांत्रिक महासत्ता बनण्याची संधी देणारी आहेत. भारताचे वैज्ञानिक, अभियंता आणि तांत्रिक तज्ञांनी अनेक दशकांपासून जागतिक टप्प्यावर आपली प्रतिभा जिंकली आहे. आजही यशाच्या कथा लिहिल्या जात आहेत. अंतराळात चंद्रयान -३ आणि मंगलियनचे यश, लस बांधण्यात डिजिटल पेमेंट सिस्टमचा अभूतपूर्व विस्तार आणि जागतिक नेतृत्व हा आमच्या क्षमतेचा पुरावा आहे. आज जगातील वर्चस्वाची लढाई रणांगणावर नाही तर अर्थव्यवस्था, तंत्रज्ञान आणि नाविन्यपूर्णतेवर आधारित असणार आहे. डेटा, डिजिटल नेटवर्क आणि प्रगत तंत्रज्ञान नियंत्रित करणारे देश उद्याच्या जागतिक प्रणालीचा निर्णय घेतील. या युद्ध संग्रामामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) हे नवीन सत्ता समीकरणाचे केंद्र बनणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आरोग्य, शिक्षण, शेती, वाहतूक आणि संरक्षण प्रदेशात बदल घडवून आणत आहे. एआय हे केवळ तंत्रज्ञानच नाही तर आर्थिक सबलीकरण आणि सामरिक क्षमतेचा आधार आहे. २०२५ पर्यंत नासकमच्या मते, एआय आणि डेटा भारताच्या जीडीपीमध्ये सुमारे ५०० अब्ज डॉलर्सचे योगदान देऊ शकतो. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमचा अंदाज आहे की २०३० पर्यंत एआय सुमारे तीन कोटी नवीन रोजगार तयार करू शकते. या प्रदेशात मागे राहण्याचा धोका भारत घेऊ शकत नाही. प्रत्येक क्षेत्रातील विविध एआय आधारित तांत्रिक अनुप्रयोगांचे मूल्यांकन करून त्याची क्षमता आणि उत्पादकता वाढविणे आवश्यक आहे. एआयच्या मदतीने आम्ही शेतीमधील उत्पन्नाचा अंदाज, जलद निदान, शिक्षणातील वैयक्तिक मार्गदर्शन, आपत्ती व्यवस्थापनातील अचूक योजना देऊन या क्षेत्रातील उत्पादकता आणि रोजगार वाढवू शकतो. केवळ तंत्रज्ञानाचे सेवन करणे पुरेसे नाही. आम्हाला स्वतः एआय अल्गोरिदम, भाषिक मॉडेल आणि हार्डवेअर सोल्यूशन्स देखील विकसित करावे लागतील. आमच्या डिजिटल स्वदेशी चळवळीला बळकटी देण्यासाठी हे देखील खूप महत्वाचे आहे. आज देशींची व्याप्ती कपडे किंवा शेतीपुरती मर्यादित नाही. याचा अर्थ डिजिटल युगात डेटा, सॉफ्टवेअर आणि हार्डवेअरवरील आत्मनिर्भरता. सरकारच्या म्हणण्यानुसार, भारताची डिजिटल अर्थव्यवस्था आर्थिक वर्ष २०२२-२३ मधील राष्ट्रीय उत्पन्नाच्या ११.७ टक्के होती आणि २०३० पर्यंत ती २० टक्क्यांपर्यंत पोहोचू शकते. आम्ही आपल्या हातात तांत्रिक नेतृत्व ठेवल्यास हे शेती आणि उत्पादनांपेक्षा एक मोठी शक्ती देखील बनू शकते. आजचा जागतिक परिस्थिती देखील आम्हाला या दिशेने वेगाने पुढे जाण्याचे सूचित करते. उर्जा संकट, पर्यावरणीय आव्हाने, आर्थिक अस्थिरता आणि सुरक्षिततेच्या धोक्यांचा व्यवहार आता जागतिक स्तरावर अनिवार्य झाला आहे. या जटिल परिस्थितीत, आत्मरिलीएन्स केवळ आर्थिक धोरण नाही तर राष्ट्रीय सुरक्षा आणि स्थिरतेचा आधार देखील आहे. भारत त्याच्या प्राचीन सभ्यता, लोकशाही मूल्ये आणि सांस्कृतिक विविधतेवर आधारित टिकाऊ आणि सर्वसमावेशक विकास मॉडेल सादर करू शकतो. भारत आज जगातील सर्वात मोठी युवा टास्क फोर्स आहे. आमच्याकडे कामकाजाच्या वयाची संख्या इतकी जास्त आहे की जर त्यांना योग्य दिशा, शिक्षण आणि संधी मिळाल्यास ते देशाच्या आर्थिक प्रगतीस अभूतपूर्व वेग देऊ शकतात. इंटरनेटवर एआय शिकणाऱ्या विद्यार्थी आणि व्यावसायिकांच्या संख्येत भारत जगात आघाडीवर आहे. म्हणजेच, व्याज आणि उत्साह विपुल प्रमाणात अस्तित्वात आहे, परंतु शिक्षणाची संख्या असूनही, कौशल्य आणि कार्यक्षमतेच्या पातळीमध्ये अजूनही फरक आहे. याचा अर्थ असा आहे की जे शिकत आहे ते व्यावहारिकदृष्ट्या समजून घेण्याची आणि लागू करण्याची क्षमता आणखी सुधारणे आवश्यक आहे. जर आपण हा फरक भरण्यास यशस्वी झालो तर ही युवा शक्ती केवळ भारतच नव्हे तर संपूर्ण जगासाठी तांत्रिक उपाय तयार करू शकते. भारताचे ध्येय केवळ तांत्रिक उत्पादने आणि सेवांचे आयात किंवा वापर नव्हे तर स्वतःला तांत्रिक निर्माता, पुतणे आणि जागतिक नेते म्हणून स्थापित करणे आवश्यक आहे. आमची जबाबदारी आहे की आपले स्वातंत्र्य सैनिक आपल्याला स्वातंत्र्य देतात, आपण आर्थिक आणि तांत्रिक स्वातंत्र्य दृढपणे मिळवू शकतो. हे डिजिटल देशींचे सार आहे, विकसित भारताचा हा मार्ग आहे आणि हा वारसा असेल जो आपण नव्या अर्थातच युवापिढीकडे सोपवू शकतो.

लोकसंसद

## भारतात ऑनलाइन शॉपिंगचा वाटा फक्त ८ टक्के!

सध्याच्या डिजिटल युगात, ऑनलाइन शॉपिंग करण्यासाठी वेळेचे नसलेले बंधन, निरनिराळ्या सवलती, वस्तूंचे भरपूर पर्याय, वस्तूंची जलद डिलिव्हरी तसेच वस्तू पसंत न पडल्यास परत करण्याचा पर्याय अशा अनेक गोष्टींमुळे ऑनलाइन शॉपिंगकडे लोकांचा कल वेगाने वाढत आहे. २०२४ मध्ये ऑनलाइन खरेदीदारांची जागतिक संख्या २.७१ अब्ज इतकी होती, ती २०२५ मध्ये २.७७ अब्जांपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे. सिंगापूरस्थित डेटारिपोर्टलच्या आकडेवारीनुसार, ऑनलाइन खरेदीच्या बाबतीत अमेरिका आघाडीवर आहे. या देशात ऑनलाइन खरेदीचा वाटा ३३.७ टक्के आहे. तर चीन दुसऱ्या क्रमांकावर असून चीनचा ऑनलाइन खरेदीचा वाटा ३१.२ टक्के आहे. त्यानंतर युकेचा (२३.२ टक्के) तिसरा क्रमांक, दक्षिण कोरियाचा (२२ टक्के) चौथा क्रमांक आणि नेदरलँड्सचा (२०.९ टक्के) पाचवा क्रमांक लागतो. त्यानंतर या यादीमध्ये अनुक्रमे कॅनडा (१७.९टक्के), जपान (१६.२टक्के), इटली (१४.९टक्के), जर्मनी (१४.६टक्के) आणि नॉर्वे (१४.५ टक्के) हे देश आहेत. भारतात ऑनलाइन शॉपिंगचा वाटा फक्त ८ टक्क्यांच्या दरम्यान असल्याने या यादीत भारत पहिल्या २५ देशांमध्येही नाही. मात्र २०३० पर्यंत भारताची ऑनलाइन शॉपिंग करणाऱ्यांची संख्या ते १५ ते १७ टक्क्यांपर्यंत म्हणजे जागतिक सरासरीच्या १७.३ टक्क्यांच्या जवळपास पोहोचेल असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे**

## आधी लाथ मग सारवासारव

गेल्या दोन दिवसांपासून जालन्यातील एका व्हिडिओने समाज माध्यमांवर जोरदार चर्चा रंगवली आहे. पोलीस उपाधिक्षक अनंत कुलकर्णी यांनी आंदोलकाला लाथ मारल्याचा हा व्हिडिओ आहे. स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या ताफ्याला अडवण्याचा प्रयत्न करणाऱ्या आंदोलकाला अगदी फिल्मी स्टाईलने उडी मारून कमरेत लाथ घालतानाचे दृश्य कॅमेऱ्यात कैद झाले आणि क्षणात जनक्षोभ उसळला. सामान्य जनतेच्या दृष्टीने पोलीस अधिकारी हा कायदा आणि शिस्तीचे प्रतीक असतो. अशा अधिकाऱ्याने लाथ घालणे हे वर्तन संतापजनक ठरते. म्हणूनच सोशल मीडियावर संतप्त प्रतिक्रिया उमटल्या, संबंधित अधिकाऱ्यावर कारवाईची मागणी वाढू लागली. जनतेचा आक्रोश हा फक्त त्या एका लाथेबद्दल नव्हता; तर अन्यायाविरोधात आवाज उठवणाऱ्याला अशा रीतीने चिरडण्याच्या प्रवृत्तीबद्दल होता.

**– दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

दिनविशेष

# नेताजी सुभाषचंद्र बोस भारतीय क्रांतिकारक

नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा जन्म २३ जानेवारी १८९७ रोजी ओरिसातील कटक येथे झाला आणि विमान अपघातात भाजलेल्या जखमांमुळे १८ ऑगस्ट १९४५ रोजी तैवानमधील रुग्णालयात त्यांचे निधन झाले.

सुभाषचंद्र बोस हे असाधारण नेतृत्व कौशल्य आणि करिष्माई वक्ते असलेले सर्वात प्रभावशाली स्वातंत्र्यसैनिक मानले जातात. 'तुम मुझे खून दो, मैं तुम्हे आझादी दुंगा', 'जय हिंद' आणि 'दिल्ली चलो' ही त्यांची प्रसिद्ध घोषणा आहेत. त्यांनी आझाद हिंद फौजची स्थापना केली आणि भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात अनेक योगदान दिले. स्वातंत्र्य मिळवण्यासाठी वापरलेल्या त्यांच्या लढाऊ दृष्टिकोनासाठी आणि त्यांच्या समाजवादी धोरणांसाठी ते ओळखले जातात. नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा जन्म २३ जानेवारी १८९७ रोजी कटक (ओरिसा) येथे प्रभावती दत्त बोस आणि जानकीनाथ बोस यांच्या पोटी झाला. त्यांचे वडील कटकमध्ये एक यशस्वी वकील होते आणि त्यांना 'राय बहादूर' ही पदवी मिळाली. त्यांनी त्यांचे शालेय शिक्षण त्यांच्या भावंडांप्रमाणेच कटकमधील प्रोटेस्टंट युरोपियन स्कूल (सध्या स्टीवर्ट हायस्कूल) येथे केले.



त्यांनी प्रेसिडेन्सी कॉलेजमधून पदवी प्राप्त केली. वयाच्या १६ व्या वर्षी स्वामी विवेकानंद आणि रामकृष्ण यांच्या शिकवणी वाचल्यानंतर त्यांच्यावर प्रभाव पडला. त्यानंतर त्यांच्या पालकांनी त्यांना भारतीय नागरी सेवेची तयारी करण्यासाठी इंग्लंडमधील केंब्रिज विद्यापीठात पाठवले. १९२० मध्ये त्यांनी नागरी सेवा परीक्षा उत्तीर्ण केली, परंतु एप्रिल १९२१ मध्ये, भारतातील राष्ट्रवादी गोंधळाबद्दल ऐकल्यानंतर त्यांनी उमेदवारीचा राजीनामा दिला आणि घाईघाईने भारतात परतले.

२१ ऑक्टोबर १९४३ रोजी, सुभाष बोस, जे आता नेताजी म्हणून ओळखले जात होते, त्यांनी सिंगापूरमध्ये स्वतंत्र भारताच्या (आझाद हिंद) हंगामी सरकारची स्थापना करण्याची घोषणा केली. नेताजी जपानी लोकांनी व्यापलेल्या अंदमानला गेले आणि तेथे भारताचा ध्वज फडकवला. १९४४ च्या सुरुवातीला, आझाद हिंद फौजेच्या तीन तुकड्यांनी ब्रिटिशांना भारतातून हाकलून लावण्यासाठी भारताच्या ईशान्येकडील भागांवर हल्ला केला. आझाद हिंद फौजेच्या सर्वात प्रमुख अधिकाऱ्यांपैकी एक शाह नवाज खान यांच्या मते, भारतात प्रवेश केलेल्या सैनिकांनी स्वतःला जमिनीवर पालथे ठेवले आणि त्यांच्या मातृभूमीच्या पवित्र मातीचे उत्कटतेने चुंबन घेतले. तथापि, आझाद हिंद फौजेचा भारताला मुक्त करण्याचा प्रयत्न अयशस्वी झाला.

भारतीय राष्ट्रवादी चळवळ जपानी सरकारला भारताचा मित्र मानत नव्हती. जपानच्या आक्रमणाला बळी पडलेल्या देशांच्या लोकांबद्दल त्यांची सहानुभूती होती. तथापि, नेताजींचा असा विश्वास होता की जपानने पाठिंबा दिलेल्या आझाद हिंद फौजेच्या मदतीने आणि भारतात झालेल्या बंडामुळे भारतावरील ब्रिटिश राजवट संपुष्टात येऊ शकते. 'दिल्ली चलो'चा नारा आणि जय हिंदचा जयघोष असलेले आझाद हिंद फौज देशाच्या आत आणि बाहेरील भारतीयांसाठी प्रेरणास्थान होते. भारताच्या स्वातंत्र्यासाठी नेताजींनी आग्नेय आशियातील सर्व धर्म आणि प्रदेशातील भारतीयांसोबत एकत्र येऊन मोर्चा काढला.

भारताच्या स्वातंत्र्यासाठीच्या कार्यात भारतीय महिलांनीही महत्त्वाची भूमिका बजावली. कॅप्टन लक्ष्मी स्वामीनाथन यांच्या नेतृत्वाखाली आझाद हिंद फौजेची महिला रेजिमेंट स्थापन करण्यात आली. तिला राणी झाशी रेजिमेंट असे नाव देण्यात आले. आझाद हिंद फौज ही भारतीय लोकांसाठी एकता आणि शौर्याचे प्रतीक बनली. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील महान नेत्यांपैकी एक असलेले नेताजी जपानने शरणागती पत्करल्यानंतर काही दिवसांनी एका विमान अपघातात मृत्युमुखी पडले.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

१८ ऑगस्ट

१) श्री. तानाजी नारायण मयेकर
श्रीबाग-३, अलिबाग
१८-०८-१९३६

२) श्री. रमेश नारायण शिंपी
अलिबाग
१८-०८-१९५०

३) श्रीम. प्रेमलता विवेक कामत,
कामतआळी, अलिबाग
१८-०८-१९५४

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**विमल सॉ मिल उचेडे पेण**



**निलेश घरत, स्मृतिदिन अलिबाग**



**सौ सिंधू शैलेंद्र काळे, स्मृतीदिन, अलिबाग**

# जाहिरातदारांकडून ‘सोनेरी’ धूळफेक

## ● नियंत्रण यंत्रणांची निष्क्रियता लुटीसाठी पोषक ● फसवणूक टाळण्यासाठी जागरूकता निकडीची

**| बेलापूर | प्रतिनिधी |**

सणासुदीच्या काळात प्रिंट, डिजिटल आणि सोशल मीडियातून सोन्याच्या दागिन्यांच्या जाहिरातींचा पाऊस पडत असतो. किमान ५० टक्के ग्राहक केवळ जाहिरातींच्या प्रभावाखाली सोन्याच्या खरेदीकडे वळतात. परंतु; प्रत्यक्षात सूट फक्त नावालाच असते. फसव्या सूट योजनांच्या माध्यमातून नागरिकांची प्रचंड प्रमाणात दिशाभूल केली जाते. त्यामुळे भाजीपाला खरेदीत काटेकोर असणारे अनेक ग्राहक याला बळी पडत आहेत. नियंत्रण यंत्रणाचाच्या निष्क्रियतेमुळे ‘सोनेरी’ धूळफेक होत आहे. त्यामुळे फसवणूक टाळण्यासाठी जागरूकता गरजेची असल्याचे बेलापूर येथील सजगर नागरी मंचाकडून बोलले जात आहे.

भारतीयांच्या विशेषतः महिलांच्या मनावर ‘सोने म्हणजे सुरक्षित गुंतवणूक’ हे सूत्र खोलवर बिंबवले गेले आहे. त्यामुळे महिलांचा कल सोन्याकडे अधिक असतो. परंतु; ग्राहकांच्या भावनिक खरेदीचा गैरफायदा सोने व्यापारी घेताना दिसत आहेत. त्याचबरोबर अनेक नामांकित ज्वेलर्स ५० टक्के सूट, १०० वर्षांचा विश्वास, गुणवत्तेचा वारसा अशा घोषवाक्यांनी ग्राहकांना आकृष्ट करत असतात. परंतु; प्रत्यक्षात सूट फक्त नावालाच असते. फसव्या सूट योजनांच्या माध्यमातून नागरिकांची दिशाभूल केली जाते. दागिने करणावळीच्या सुटी मागे छुपी हकीकत लपलेली असते.

२५ ग्रॅमपर्यंत १५ टक्के सूट, ५० ग्रॅमपर्यंत २०टक्के सूट, ७५ ग्रॅमपर्यंत २५ टक्के सूट, तर ७५ ग्रॅमपेक्षा जास्त ३० टक्के सूट असे स्तर असतात. परंतु; जाहिरात करताना मात्र ५० टक्के सूट हे ग्राहकांच्या मनावर बिंबवले जाते. या अटी जाहिरातींमध्ये स्पष्ट दिलेल्या नसतात. त्यामुळे महिलांसाठी भावनिक खरेदी असल्याने, एकदा दुकानात गेल्यावर पुरुष नकार देत नाहीत आणि दुकानदार याचा फायदा घेतात. त्यामुळे नियंत्रण यंत्रणांची निष्क्रियता ग्राहक लुटीसाठी पोषक ठरते आहे. आयुर्वेद औषधांच्या फसव्या जाहिरातींसाठी पतंजलीवर कारवाई झाली, मात्र सोन्याच्या दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींवर संबंधित यंत्रणा गप्प बसलेली आहे. ग्राहक हितासाठी लढा देणाऱ्या संघटना-यंत्रणांनी सोनेरी फसवणुकीकडे लक्ष देणे निकडीचे आहे.

### डिजिटल व्यवहार बंधनकारक करावे

**एकीकडे प्रामाणिक पद्धतीने पैसे जमावणाऱ्या ग्राहकांची दिशाभूल करत फसवणूक केली जात असताना सोने खरेदी म्हणजे काळे धन लपवण्याचा ‘सोनेरी’ मार्ग ठरत आहे. अशा प्रकारची खरेदी केवळ डिजिटल देयकांच्या माध्यमातून करणे अनिवार्य करण्याचा धाडसी निर्णय काळे धन मुक्तीच्या घोषणा करणाऱ्या सरकारने करायला हवी. सरकारने सोने व्यापारांनी ग्राहकांना ईमेलद्वारे ई-बिल देणे व सर्व व्यवहार फक्त डिजिटल पद्धतीनेच करणे बंधनकारक करावे. सर्व सोने व्यापारांना मंगळसूत्र महोत्सव किंवा तत्सम सवलतींच्या जाहिरातीतच सर्व अटी-शर्ती स्पष्ट नमूद करणे सक्तीचे** करावे. सोने दराची अधिकृत माहिती देणारे संकेतस्थळ असावे. सर्व दागिन्यांच्या घडणावळीचे किमान-कमाल दर निश्चित केले जावेत. सोन्या चांदीच्या दुकानातील वजन काट्यांची सातत्याने तपासणी केली जावी.



**“ जागरूकता ही ग्राहकांची देखील जबाबदारी आहे. याचे भान ठेवत ग्राहकांनी भावनिकतेपेक्षा माहिती आणि जागरूकतेच्या आधारावर खरेदीचा निर्णय घेणे गरजेचे आहे. असे केल्यास सोनेरी धूळफेक करणाऱ्यांचे डाव आपोआप फसतील.**
**- सुधीर दाणी, अध्यक्ष, सजग नागरी मंच, बेलापूर ”**

## मुरूड नगरपरिषदेच्या प्रांगणात ध्वजारोहण

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

मुरुड-जंजिरा नगरपरिषदेच्या प्रांगणात प्रशासक तथा मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करून ध्वजारोहण करण्यात आले. तर, मुरुड तहसीलदार कार्यालयातील प्रांगणात तहसीलदार आदेश डफळ यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी सर एस.ए. हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय गीत सादर केले. त्यानंतर ‘जय जय महाराष्ट्र माझा‘ या गाण्याची धून वाजवण्यात आली. त्यानंतर ‘स्वातंत्र्य दिनाचा विजय असो’, ‘भारत माता की जय’, ‘जय जवान जय किसान’ अश घोषणा देऊन मानवंदना देण्यात आली. यावेळी मुरूड तालुका स्वातंत्र्य दिन आयोजन समिती तर्फे विविध क्षेत्रात केलेल्या स्पृहणीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा तहसीलदारांतर्फे सन्मान करण्यात आला. यावेळी प्रशासक तथा मुख्याधिकारी सचिन बच्छाव, तहसीलदार आदेश डफळ, पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे, प्रशासकीय अधिकारी नंदकुमार आंबेतकर, सतेज निमकर, अनिकेत जगदाळे, अनिकेत वाजे, नायब तहसीलदार संजय तवर आदिंसह अनेक मान्यवर उपस्थित होते.



## कॅन्सरमुक्त अभियानाला पनवेलमधून सुरुवात

**| पनवेल | प्रतिनिधी |**

रोटरी क्लब ऑफ पनवेल सनराईज दरवर्षी मॅमोग्राफी आणि पॅप स्मिअर या शिबिरांचे आयोजन करते. या वर्षीच्या क्लब अध्यक्षा रुपाली यादव यांनी अष्टविनायक हॉस्पिटल्ससह पनवेलमधील इतर काही रोटरी क्लब्स व काही संस्था-समाज यांना एकत्र घेऊन या शिबिराची सुरुवात ३ ऑगस्ट रोजी केली. तसेच, सलग दुसरे शिबीर १५ ऑगस्ट रोजी घेण्यात आले. या अभियानात दोन्ही शिबीरे मिळून ७७ महिलांनी डिजीटल मॅमोग्राफी आणि सोनोमॅमोग्राफी तसेच ३९ महिलांनी पॅपस्मिअर करून घेतले. या शिबिरांत रोटरीचे पनवेल, न्यू पनवेल, पनवेल सिंफनी, पनवेल इलीट, पनवेल महानगर, पनवेल इंडस्ट्रील टाऊन, खारघर मिडटाऊन आणि रोटरी क्लब ऑफ कळंबोली तसेच जाणीव सामाजिक सेवा संस्था आणि अखिल पनवेल तालुका भंडारी समाज इत्यादी संघटनांनी सहभाग घेतला होता. पनवेल सनराईजच्या अध्यक्षा रुपाली यांनी या शिबिराच्या उद्घाटनावेळी, हे शिबीर दर महिन्याच्या एका रविवारी घेण्याचे मानस बोलून दाखवले. त्यावेळेस सर्व सिनर्जी पार्टनर क्लब्स आणि जाणीव सामाजिक सेवा संस्थेचे अध्यक्ष विजय गोरेगांवकर यांनी यात सहभाग घेण्यास दुजोरा दिला.

## स्वातंत्र्यदिनी रुग्णवाहिकेचे लोकार्पण



**| चिरनेर | प्रतिनिधी |**

भारताच्या स्वातंत्र्यदिनी शुक्रवारी (दि.१५) चिरनेर ग्रामपंचायतीच्यावतीने नवीन रुग्णवाहिकेचा लोकार्पण सोहळा पार पडला. येथील अत्यावश्यक रुग्णांना तात्काळ सेवा उपलब्ध व्हावी, यासाठी चिरनेर ग्रामपंचायतीने हे उचललेले हे महत्त्वाचे पाऊल आहे. या रुग्णवाहिकेचे लोकार्पण सामाजिक कार्यकर्ते शंकर नारंगीकर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी सरपंच भास्कर मोकल, राजिपचे माजी सदस्य संतोष ठाकूर, माजी सरपंच पद्माकर फोफेरकर, शेकापचे उरण तालुका चिटणीस सुरेश पाटील, उपसरपंच अरुण पाटील, माजी उपसरपंच सचिन घबाडी, पोलीस पाटील संजय पाटील, तंटामुक्तीचे अध्यक्ष अलंकार परदेशी, अरुण ठाकूर, ग्रामपंचायत सदस्य प्रफुल्ल खारपाटील, समाधान ठाकूर, समीर डुंगीकर, मृणाली ठाकूर, समुद्रा म्हात्रे, भारती ठाकूर, दीपक कातकरी, यशोदा कातकरी, नीलम चौलकर, निकिता नारंगीकर, वनिता गोंधळी, जयश्री चिर्लेकर आदींसह अनेक मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते. तसेच, चिरनेर गावात अनेक शासकीय ठिकाणी ध्वजारोहण करण्यात आले.

## स्मशानभूमीतील गॅस शवदाहिनी बंद

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन येथील मठाचा गवंड येथील स्मशानभूमीत नगर परिषदेने गॅस शवदाहिनी सुरु केल्यामुळे नागरिकांची मोठीच सोय झाली होती. परंतु, काही तांत्रिक कारणांमुळे ही शवदाहिनी सध्या बंदावस्थेत आहे. त्यामुळे नागरिकांची मोठीच गैरसोय होत आहे. गॅस शवदाहिनी बंद असल्यामुळे मृतदेहाचे लाकडांवर दहन करण्याशिवाय अन्य पर्याय उरत नाही. परंतु, सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने लाकडेही भिजलेली असल्यामुळे लवकर पेटत नाहीत. त्यामुळे मोठीच अडचण निर्माण होते. दुसरे म्हणजे शासकीय विश्रामगृहाजवळील स्मशानभूमीतील दहनाच्या जागेवरील पत्रेही उडाले असल्यामुळे पावसामुळे लाकडे पेटण्यास खूप विलंब लागतो. त्यातच भर म्हणून अग्नी प्रज्वलित करण्यासाठी आवश्यक असणारे रॉकेलही हल्ली उपलब्ध होत नसल्यामुळे खूप गैरसोय होते. शिवाय या स्मशानभूमीत सध्या कचऱ्याचे ढीग साचल्यामुळे नागरिकांची मोठीच गैरसोय होत आहे. या सर्वांची दखल घेऊन श्रीवर्धन नगर परिषदेने मठाचा गवंड येथील स्मशानभूमीत असलेल्या गॅस शवदाहिनीची लवकरात लवकर दुरुस्ती करुन नागरिकांची होणारी गैरसोय दूर करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## उरण तालुक्यातील भातशेती बहरली

**| उरण | प्रतिनिधी |**

उरण तालुक्यात भातशेती लागवडीची कामे पूर्ण झाली असून यावर्षी भात पिकास पोषक पाऊस, वातावरण निर्माण होत असल्याने भातशेती बहरली आहे. भातशेतीला पोषक असणारा पाऊस आणि वातावरण असाच राहिला तर यावर्षी भाताचे पीक चांगले येईल, असा विश्वास तालुक्यातील शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे.

भातशेती ही महाराष्ट्रातील एक महत्त्वाची शेती आहे. विशेषतः कोकण भागात भात पिकवला जातो, जो भारतातील सुमारे ६५ टक्के लोकांच्या आहाराचा मुख्य भाग आहे. भात शेतीमध्ये योग्य वेळी पाणी देणे, खते आणि कीटकनाशकांचा वापर, तसेच रोपांची योग्य निवड आणि लागवड यांसारख्या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. भात शेतीसाठी योग्य जमीन, पाणी आणि हवामान आवश्यक आहे. सामान्यतः भातशेती खरीप हंगामात (जून-जुलै) केली जाते आणि कापणी हिवाळ्यात (नोव्हेंबर-डिसेंबर) केली जाते. रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यात ही भातशेती मोठ्या प्रमाणात केली जाते. यावर्षी भात पिकास पोषक पाऊस, वातावरण निर्माण होत असल्याने भात शेती बहरली आहे.



## संजय थळे यांच्या कवितासंग्रहाचे प्रकाशन

**| पाली/गोमाशी | प्रतिनिधी |**

सुधागड तालुक्यातील दिघेवाडी येथील रायगड जिल्हा परिषद शाळेत कार्यरत असणारे उपक्रमशील शिक्षक संजय थळे यांच्या ‘बहुरंगी’ या कवितासंग्रहाचे प्रकाशन शुक्रवारी (दि.१५) करण्यात आले. हा प्रकाशन सोहळा जेष्ठ समाजसेवक भालचंद्र भणगे, चंद्रकांत दिघे, साधूराम जाधव, ग्रामपंचायत सदस्य सुमित मांढरे, दिनेश दिघे, संतोष दिघे, राजेंद्र दिघे, चंद्रकांत फणसे, अरविंद फणसे, उतेकर बंधू व ग्रामस्थ मंडळाच्या उपस्थितीत पार पडला.



संजय थळे यांनी शिक्षण क्षेत्रामध्ये काम करत असताना विद्यार्थ्यांसाठी व समाजासाठी प्रेरणादायक व प्रबोधनात्मक विचार या कवितेतून मांडलेले आहेत. लहान मुलांसाठी कविता, विद्रोही कविता, प्राणी-पक्षी समाजापुढील समस्या, निसर्गातील घटना याबाबत अतिशय सुंदर पद्धतीने कविता रचना केलेली आहे. सर्व ग्रामस्थांनी त्यांनी केलेल्या या कवितासंग्रहाबद्दल अभिनंदन केले.

## कळंबोलीमधील तरूण बेपत्ता

**| पनवेल | प्रतिनिधी |**

कळंबोली वसाहतीमध्ये राहणाऱ्या तरुणाने मुंबई येथे जातो असे सांगून निघून गेला आणि तो पुन्हा घरी परतलाच नाही. सगीर सिद्दीक खान (२४) असे या तरुणाचे नाव आहे. त्याची उंची ५ फुट, रंग-सावळा, चेहरा गोल, नाक सरळ, डोक्याचे केस काळे, दाढी-बारीक, अंगात नेसणीस पिवळ्या रंगाचा टी-शर्ट, निळ्या रंगाची जिन्स पॅन्ट, पायात चप्पल, सोबत मोबाईल फोन आहे. त्याला हिंदी भाषा अवगत आहे. सगीर खान हरविल्याची तक्रार कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आली असून या तरुणाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पोलीस हवालदार एस.व्ही. मासुळ यांच्याशी संपर्क साधावा.



## होमगार्ड मुख्यालयात स्वातंत्र्यदिन साजरा

**| वेनगाव | प्रतिनिधी |**


देशाचा स्वातंत्र्य दिन सोहळ्याचा कार्यक्रम अलिबाग येथील होमगार्ड मुख्यालय जिल्हा प्रशिक्षण केंद्रात शुक्रवारी (दि.१५) जिल्हा समादेशक होम गार्ड तथा अपर पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे यांच्या हस्ते संपन्न झाला. याप्रसंगी अभिजीत शिवथरे यांनी होमगार्ड बजावत असलेल्या कार्याचा आढावा घेऊन होमगार्डसने केलेल्या कामांचे कौतुक केले. तसेच, मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था घाटकोपर येथील मानसेवी निदेशक प्रशिक्षण पाठ्यक्रम क्रमांक १०७२ मध्ये रायगड जिल्ह्यातील प्रसाद जगन्नाथ नेमन यांनी प्रथम क्रमांक पटकावून उल्लेखनीय कामगिरी केल्याबाबत त्यांना गौरविण्यात आले. या कार्यक्रमाला जिल्ह्यातील होमगार्ड, अधिकारी व कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते. हा कार्यक्रम होमगार्ड केंद्र नाईक जनार्दन पवार यांच्या नेतृत्वाखाली संपन्न झाला.

## व्हीलचेअरचे वाटप

**| पनवेल | प्रतिनिधी |**

स्वातंत्र्यदिनानिमित्त आरिन फाऊंडेशन आणि रोटरी क्लब मिलेनियम सिटी वाशी यांच्या संयुक्त विद्यमाने नवी मुंबई महानगरपालिका शाळेत विशेष उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाअंतर्गत १५ दिव्यांग मुले आणि ज्येष्ठ नागरिकांना मोफत व्हीलचेअरचे वाटप करण्यात आले. या सामाजिक उपक्रमात आरिन फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष नितेश मिसाळ, सदस्य तसेच रोटरी मिलेनियम सिटी क्लबच्या अध्यक्षा अर्चना चोरारिया, उपाध्यक्ष रमेश सोनवणे, सचिव अशोक शहा व क्लबचे इतर मान्यवर सदस्य उपस्थित होते. तसेच, एस. के. कॉलेजच्या रोट्रॅक्ट क्लबच्या सदस्यांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यावेळी आर्यन् एज्युकेशन सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश म्हात्रे, नवी मुंबई महानगरपालिकेच्या समग्र शिक्षण अभियान टीमच्या प्रमुख अनिता मोजाड, मनाली आंब्रे आलिया व रंजन इन्स्टिट्यूट, बांद्रा येथील दिव्यांग मित्र यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष सहकार्य केले.

## अवयव-देहदान जनजागृती



**| कोर्लई | प्रतिनिधी |**

स्वातंत्र्यदिनी मुरुडच्या ग्रामीण रुग्णालयात शुक्रवारी (दि.१५) मुख्यमंत्री सहाय्यता निधी अलिबाग व धर्मदाय रुग्णालय मदत कक्ष यांच्या संयुक्तविद्यमाने वैद्यकीय अधिक्षक उषा चोले यांच्या मार्गदर्शनाखाली अवयव-देहदान जनजागृती करण्यात आली. यावेळी ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिक्षक डॉ. उषा चोले, सर्व अधिकारी, मुख्यमंत्री सहायता निधी सदस्य, कर्मचारी, रुग्ण व रुग्ण नातेवाईक यांनी तंबाखू मुक्ततेची शपथ घेऊन अवयव-देहदान जनजागृती केली.

### जपली ढोलकी बनविण्याची परंपरा | २०० वर्षांहून अधिक काळ व्यवसाय

## मुस्लिम बांधवांकडून आदर्श संस्कृतीचे दर्शन

**| रोहा | प्रतिनिधी |**

हिंदू धर्मात ढोलकी हे पारंपरिक वाद्य आहे. त्यामुळे हिंदू धर्मातील सण समारंभात ढोलकीचे विशेष महत्त्व असते. अशी ही ढोलकी बनविण्यासाठी मुस्लीम बांधवांचेही हात राबत आहेत. २०० वर्षांहून अधिक काळ असलेला हा पारंपारिक व्यवसाय रोहा येथील शेख कुटूंबातील चौथी पिढी आपला पारंपारिक व्यवसाय संभाळून आपला उदरनिर्वाह करित आहे.

लखनऊ येथील रहिवासी असणारे शेख कुटूंबिय ढोलकी व्यवसायाच्या निमित्ताने रोहा येथे आले. वर्षानुवर्षे आपल्या रोजीरोटीसाठी व्यवसाय करणारे पंजोबा हाजी अली शेख व आजोबा हाजी मागन यांच्या पश्चात बल्लू शेख व त्यांचा



मुलगा अबीद्दीन शेख यांनी हा व्यवसाय पुढे नेला. ही कुशल कारागीर मंडळी गेली अनेक वर्षांपासून गौरी गणपती सणाच्या तोंडावर रोह्यामध्ये येऊन सुंदर व आकर्षक ढोलक्या बनवून आपला व्यवसाय करीत आहेत. त्यांचा हा पिढीजात व्यवसाय असून सुमारे २०० वर्षांहून अधिक काळापासून ते ढोलकी तयार करणे व विक्री करणे हा व्यवसाय करीत आहेत. या व्यवसायात त्यांची ही चौथी पिढी उतरली आहे. ते तयार करीत असलेल्या ढोलक्या या विविध आकार व प्रकारच्या असतात. ढोलकीची सुबकता, बाहेरील नक्षीकाम व आकार तसेच प्रकारावरून ढोलकीची किंमत ठरवतात.

आपल्या भारत देशाची संस्कृती ही जगात महान अशी संस्कृती आहे. याच संस्कृतीने जगासमोर सर्वधर्मसमभाव व सर्वधर्मसहिष्णूतेचा आदर्श घालून दिला आहे. याच अनुषंगाने रोह्यातील या मुस्लिम बांधवांनी हिंदू धर्मातील सण समारंभात लागणारी ढोलकी तयार करून व आपले कौशल्ये दाखवून एक प्रकारे आपल्या आदर्श संस्कृतीचे दर्शनच घडवून दिले आहे.

## निवडक



### म्हसळा येथे करिअर मार्गदर्शन

**म्हसळा :** कोकण टेक्नॉलॉजी सर्व्हिसेस प्रा. लि. यांच्या वतीने म्हसळा येथे करिअर मार्गदर्शन व बक्षीस वितरणाचा भव्य कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबरोबरच त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी करिअरच्या विविध संधींवर चर्चा करण्यात आली.कार्यक्रमास तबरेज गोईलकर, सहिम हवालदार, पोलीस निरीक्षक संदीप काहळे, अब्दुल शाकूर घन्सार, समीर चौगुले, नबील काझी, शाहनवाज उकये, विद्यार्थी, पालक आदी मान्यवर उपस्थिती होते.या प्रसंगी विद्यार्थ्यांनी करिअर व रोजगाराच्या संधींबाबत थेट प्रश्न विचारले. पाहुण्यांनी संयमपूर्वक व सविस्तर उत्तरे देऊन विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक जगात दिशा दाखवली. या ओपन प्रश्नोत्तर सत्रामुळे विद्यार्थ्यांना करिअरविषयक महत्त्वपूर्ण माहिती मिळाली. कोकण टेक्नॉलॉजी सर्व्हिसेस प्रा. लि.चा उद्देश म्हणजे विद्यार्थी व युवकांना आय.टी. कोडिंग क्षेत्रात मार्गदर्शन करून त्यांना उज्ज्वल भविष्यासाठी सक्षम करणे हा आहे. म्हसळा परिसरात या संस्थेचे उल्लेखनीय कार्य सुरू असून, स्थानिक विद्यार्थ्यांना नव्या तंत्रज्ञानाची जोड मिळत आहे. समारंभात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षिसे प्रदान करून त्यांचा गौरव करण्यात आला. यशामध्ये शिक्षक व पालक यांचे योगदान अधोरेखित करण्यात आले. पालकांचे मार्गदर्शन तितकेच महत्त्वाचे असल्याचा संदेश यावेळी देण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल व पुढील वाटचालीसाठी कोकण टेक्नॉलॉजी सर्व्हिसेस प्रा. लि.ला सर्व मान्यवर व उपस्थितांनी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.



### शैक्षणिक साहित्याचे वाटप

**खांब :** रोहा तालुक्यातील तळवली तर्फे अष्टमी या गावचे सुपुत्र सामाजिक कार्यकर्ते व दानशूर व्यक्तिमत्त्व मनोज दत्तात्रेय मरवडे यांच्या वतीने विद्यार्थी वर्गाला शैक्षणिक साहित्याचे वाटपाचा कार्यक्रम चिल्हे व खांब येथे संपन्न करण्यात आला. नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब शिक्षण संस्थेच्या श्रमिक विद्यालय चिल्हे रा.ग.पोटफोडे (मास्तर) विद्यालय खांब येथील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटपाचा कार्यक्रम चेअरमन महेंद्र पोटफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली व मुख्याध्यापक सुरेश जंगम व दिपक जगताप यांच्या हस्ते सदरील साहित्याचे वाटप विद्यार्थ्यांना करण्यात आले.गत दोन वर्षांपासून मनोज मरवडे सदरील शैक्षणिक साहित्य वाटप करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या विद्यालयांसाठी करीत असून शैक्षणिक कार्यात आपले बहुमोलाचे योगदान देत आहेत. मनोज मरवडे हे ठाणे येथील सुप्रसिध्द गोडबोले हॉस्पिटल येथे इन्चार्ज पदावर कार्यरत असून सामाजिक बांधिलकीच्या नात्यातून व आपले गाव व ग्रामीण भागातील विद्यालयातील विद्यार्थी यांच्या शिक्षणाप्रती ते करीत असलेले कार्य हे खरोखरच प्रेरणादायी असल्याचे मुख्याध्यापक दिपक जगताप यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले.



### गोपाळकाल्याला गरिबांना मदत

**पाली/बेणसे :** गोपाळकाल्याच्या निमित्ताने भगवान श्रीकृष्णाने गोपिकांनी उंच सुरक्षित ठेवलेले मडक्यातील लोणी व दही थर लावून काढले व गरीब सवंगड्याना खायला दिले. भगवान श्री कृष्णाचा आदर्श ठेऊन सुधागड तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते तसेच रॉबिनहूड आर्मी संस्थेच्या वतीने १५० गरीबांच्या घरात मदही, नाही पण किराणा सामान पोहचवण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप देखील केले गेले. यावेळी सिद्धेश्वर आदिवासी वाडीत शाळेत विद्यार्थ्यांना वह्या, स्टेशनरी आणि प्रत्येक घरात किराणा मालाचे वाटप केले गेले. महेश पोंगडे यांनी सांगितले की सद्य घडीला लाखांची हंडी बांधली जाते. याबरोबरच यावेळी आयोजित कार्यक्रमांना लाखो रुपये खर्च केले जातात. उंच उंच धोकादायक थर लावून हंडी फोडली जाते. मात्र दहीहंडीचा मूळ उद्देश हा वाटणे आहे, देणे आहे. गरिबांना आणि कष्टकऱ्यांना या निमित्ताने मदतीचा हात देणे आवश्यक आहे. दहीहंडीचे स्वरूप बदलले, पण श्रीकृष्णाचा हेतू तोच ठेऊन आम्ही उत्सव साजरा केला. असे देखील महेश पोंगडे यांनी सांगितले. यावेळी तुकाराम ठोंबरे, भगवान दळवी, दीपक कदम, कृष्णा वाघमारे, अशीका पवार, रॉबिनहूड आर्मी संस्था, ठाणे पदाधिकारी व सदस्य, ग्रामस्थ आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **अलिबागमध्ये ऑफिस** कामासाठी मुलगा पाहिजे. संपर्क : ९९२३२३५०५६/८१४९६७३०१८
- **अलिबाग मधील रेस्टॉरंटसाठी** वेटर, कुक, इ. पाहिजे आहेत. तसेच किचन मॅनेजरची आवश्यकता आहे. इच्छुकांनी खालील फोन क्रमांकावर संपर्क साधावा. मोबाईल क्रमांक -७७६७८५३९९९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# जमीन मोजणीसाठी स्थानिक मंजुरी आवश्यक

**भूमीअभिलेख विभाग; वहिवाटीच्या मापनासाठी आता नवीन नियम**



**| रायगड | प्रतिनिधी |**

**पोटहिश्शाची मोजणी करायची आहे, तर आता महापालिका, नगरपालिका अथवा स्थानिक नियोजन प्राधिकरणाकडून तात्पुरते रेखांकन (टेन्टेटिव्ह लेआउट) मंजूर करून घेणे भूमिअभिलेख विभागाने बंधनकारक केले आहे. त्यानंतरच तुमचा मोजणीचा अर्ज दाखल करून पोटहिश्शाची मोजणी केली जाणार आहे. या निर्णयामुळे वहिवाटीनुसार मोजणी करून जमिनीच्या तुकड्यांमुळे होणारे वाद, त्यावर होणारी बेकायदा बांधकामे, त्यातून होणारे व्यवहार आणि त्यामुळे नागरिकांचे होणारे नुकसान टाळणे शक्य होणार आहे.**

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६फ आणि एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीनुसार (यूडीसीपीआर) कोणताही विकास करण्यापूर्वी सक्षम प्राधिकरणाची परवानगी घेणे आवश्यक आहे.

परंतु शहरांच्या हद्दीत मोठ्या प्रमाणावर बेकायदा जमिनींचे तुकडे पाडले जातात. तसेच वहिवाटीची त्यांची रोजणी करून त्याआधारे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सादर करून बांधकाम परवानगी घेतली जाते. त्यातून बेकायदा खरेदी-विक्रीचे व्यवहार आणि अनधिकृत इमारती तयार होण्याचे प्रमाण वाढत आहे. ज्यामुळे नागरिकांचे मोठे नुकसान होते.

या सर्व पार्श्वभूमीवर राज्याचे जमाबंदी आयुक्त व भूमिअभिलेख विभागाचे संचालक डॉ. सुहास दिवसे यांनी याबाबतचे परिपत्रक काढले आहे. यामुळे आता स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये जमीन मोजणीच्या परवानगीसाठी रांगा लागण्याची शक्यता आहे.

**अशी आहे नवीन प्रक्रिया**

**भूमिअभिलेख विभागाने तात्पुरत्या मंजूर नकाशाच्या आधारे जागेची मोजणी करून स्थानिक विकास प्राधिकरणाकडे अहवाल पाठवणेमहापालिका, नगरपालिका, प्राधिकरणे या नियम ानुसार तपासणी करून नकाशाला अंतिम मान्यता देईलयाची प्रत भूमिअभिलेख विभागाकडे सीमांकन व दुरुस्तीसाठी पाठवेल.भूमिअभिलेख विभाग सीमांकन आणि अभिलेख दुरुस्तीची कार्यवाही करेल. जेणेकरून भूमिअभिलेख विभागातील रेकॉर्डलादेखील त्यांची नोंद घेऊन नकाशांत बदल केले जाणार.**

**यामुळे काय फायदे होणार**

**जमिनीच्या हद्दी आणि क्षेत्रांबाबतीत वाद निर्माण होण्याचे प्रमाण कमी होईल.भूखंड किंवा सदनिका खरेदी करणाऱ्यांचे होणारे नुकसान टळेल.यूडीसीपीआरमधील तरतुदींनुसार चार चौरस मीटरपेक्षा जास्त क्षेत्र असलेल्या भूखंडातील २० टक्के जागा अल्प, अत्यल्प उत्पन्न गटासाठी राखीव ठेवण्याच्या नियमाची काटेकोर अंमलबजावणी करणे शक्य होईल.वहिवाटची मोजणी करून त्यावर बांधकाम करणाऱ्याच्या प्रकाराला आळा बसेल.**

## कोकण किनारपट्टीवर अवैध एलईडी, पर्ससीन मासेमारी

- **मच्छिमारांचा संताप; आंदोलनाचा दिला इशारा**
- **मच्छिमार अवैध मासेमारीविरोधात झाले आक्रमक**

**| रायगड | प्रतिनिधी |**

रत्नागिरी आणि रायगड जिल्ह्यातील पारंपरिक मच्छिमारांनी एलईडी व पर्ससीन मासेमारी नौकांच्या अवैध मासेमारीविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. नुकतीच दापोली तालुक्यातील उटंबर येथील राधाकृष्ण मंदिरात या विषयावर मान्यवरांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली.

१ ऑगस्टपासून सुरू झालेल्या मासेमारी हंगामाच्या सुरुवातीलाच मासळीची आवक अत्यल्प आहे. त्यात बंदी असूनही एलईडी नौका आणि १ सप्टेंबर ते ३१ डिसेंबरपर्यंतच परवानगी असलेल्या पर्ससीन जाळ्यांच्या नौकांनी थेट समुद्रात उतरण्यास सुरुवात केली आहे. रायगडातील श्रीवर्धनसह काही बंदरांवर सरकारी अधिकाऱ्यांसमोरच या नौकांची तयारी सुरू असून, विरोधाचा अभाव असल्याचे पारंपरिक मच्छिमारांचे म्हणणे आहे. या बेकायदेशीर मासेमारीमुळे गेल्या ५-६ वर्षांपासून कोकण किनारपट्टीवर मत्स्यदुष्काळ निर्माण झाला आहे. परिणामी सध्या सुमारे ८० टक्के पारंपरिक नौका बंदरात व खाड्यांमध्ये नांगरून ठेवलेल्या आहेत. उदरनिर्वाहावर गदा येऊन तरुण पिढीत या व्यवसायाबाबत संभ्रम निर्माण झाला आहे.

मच्छिमार संघटनांनी मागील काही वर्षांत आंदोलने, निवेदने व पाठपुरावा करूनही शासनाकडून ठोस कारवाई न झाल्याचा आरोप करण्यात आला. शासनाने डोळेझाक केल्याने या बेकायदेशीर पद्धतींना अभय मिळाल्याचा आरोपही करण्यात आला. तसेच या मासेमारी विरोधात कायदा देखील पारित करण्यात आला आहे त्याची देखील व्यवस्थित अंमलबजावणी होताना दिसत नाही. या पार्श्वभूमीवर बेकायदेशीर मासेमारी तात्काळ थांबवावी व दोषींवर कठोर कारवाई करावी, या मागणीसाठी रायगड व रत्नागिरीतील पारंपरिक मच्छीमार एकत्र आले असून लवकरच उग्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला.

बैठकीला आमदार अशोक पाटील, मच्छिमार संघटनेचे अध्यक्ष पी. एन. चोगले, पांडुरंग चौले, मच्छिमार समितीचे कार्याध्यक्ष बाळकृष्ण चोगले, उपाध्यक्ष प्रकाश रघुवीर, पांडुरंग पावसे, दापोली मंडणगड खेड मच्छिमार कृती समितीचे सदस्य तसेच रायगड व रत्नागिरी मच्छिमार संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

## विद्युत सहाय्यकांची परिमंडलनिहाय निवड यादी जाहीर

**| रायगड | प्रतिनिधी |**

महावितरणमध्ये विद्युत सहायक पदासाठी निवड झालेल्या ५ हजार ३८१ उमेदवारांची व संबंधित परिमंडलांची यादी कंपनीच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर करण्यात आली आहे. या सर्व उमेदवारांच्या मूळ कागदपत्रांची व प्रमाणपत्रांची पडताळणी संबंधित परिमंडल कार्यालयांमध्ये २० ते २२ ऑगस्ट दरम्यान करण्यात येणार आहे. या उमेदवारांनी त्यांच्या नावासमोर नमूद परिमंडल कार्यालयांमध्ये मूळ कागदपत्रे तसेच अद्ययावत ओळखपत्राच्या मूळ प्रतीसह स्वतः हजर राहणे अनिवार्य आहे.

महावितरणने जाहिरात क्र. ०६/२०२३ अन्वये विद्युत सहायक या पदासाठी २० ते २२ मे दरम्यान ऑनलाइन क्षमता चाचणी घेतली होती. यात निवड झालेल्या उमेदवारांची यादी ३० जुलैला सविस्तर माहिती व सूचनेसह कंपनीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यानंतर १४ ऑगस्टला निवड यादीतील उमेदवार व त्यांना वर्ग केलेल्या परिमंडलांची यादी जाहीर करण्यात आली आहे.

आता येत्या २० ते २२ ऑगस्ट दरम्यान विद्युत सहायक पदासाठी निवड झालेल्या उमेदवारांच्या ऑनलाइन अर्जामधील नोंदी, अर्हता, कागदपत्रे व प्रमाणपत्रांची छाननी व पडताळणी त्यांना वर्ग केलेल्या संबंधित परिमंडल कार्यालयांमध्ये होणार आहे.

## रायगडातून एक लाख मराठ्यांचा हुंकार

**आझाद मैदानावर उपस्थित राहणार; राज्य समन्वयक डॉ.सुनील पाटील यांची माहिती**

**| खोपोली | प्रतिनिधी |**


मराठा संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील २९ ऑगस्टला आझाद मैदान मुंबई येथे आमरण उपोषण करणार आहेत. त्या संदर्भात सकल मराठा समाज रायगड जिल्ह्याची बैठक धाकटी पंढरी विठ्ठल रखुमाई मंदिर ताकई येथे बैठक १५ ऑगस्ट रोजी पार पडली.

यावेळी रायगड जिल्ह्यातून १ लाख समाज बांधव सहभाग घेणार, असे मत राज्य समन्वयक डॉ.सुनील पाटील यांनी व्यक्त केले असून या बैठकीत नियोजन संदर्भात चर्चा करण्यात आल्याने मराठा समाज बांधव आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले.



२९ ऑगस्टला मनोज जरांगेंनी आरक्षणासाठी राज्यभरातल्या मराठा समाजाला सोबत घेत मुंबईत मोठं आंदोलन उभारण्याची घोषणा करताच सर्व मराठा समाज पुन्हा पेटून उठला असून मराठा समाजाला ओबीसी मधून आरक्षण मिळावे, यासाठी या आंदोलनाच्या माध्यमातून लढा उभारण्याच्या तयारीत असताना या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर रायगड जिल्ह्यातील मराठा समाज बांधव १५ ऑगस्ट रोजी खोपोलीतील धाकटी पंढरी ताकई मंदिरात एकत्र होत याबाबत नियोजन करीत असून मनोज जरांगे पाटील हे मुंबई येथे जात असताना खोपोलीतून जाणार असल्याने या आंदोलनात सहभागी झालेल्या मराठा समाज बांधवांची कोणतीही गैरसोय होऊ नये म्हणून नियोजन करीत असून या लढ्यात मराठा समाज बांधव सहभाग घेणार आहेत असे या बैठकीत ठरवण्यात आले.

> **रायगड जिल्ह्यातून जवळपास १ लाख समाज बांधव आझाद मैदानावर उपस्थित राहणार असून यावेळी लागेल ती मदत रायगड जिल्ह्यातून करण्यात येईल असे नियोजन बैठकीत समन्वयकांच्या वतीने ठरवण्यात आले आहे. हा लढा शेवटचा नसून अंतिम लढाई आरक्षण घेण्यासाठी असून मराठा आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण न भूतो न भविष्यती असणार असल्याने मोठ्या संख्येने समाज बांधवांनी यामध्ये सहभाग घ्यावा.**
> **- डॉ.सुनील पाटील, राज्य समन्वयक मराठा समाज**



● पोयनाडजवळ कुर्डूस गावापासून ३ किमी अंतरावर असलेल्या कुर्डूसचा धबधबा अतिशय सुंदर आहे. पूर्ण धबधब्यापर्यंत गाडी जाते हिरवाईत नटलेला हा धबधबा एकदातरी पर्यटकांनी पाहिला पाहिजे. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

## होराळे येथे काल्याच्या कीर्तनातून सांगता

**| पाताळगंगा | प्रतिनिधी |**

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर, होराळ येथे ४९ वर्ष हा सप्ताह सुरु असून, उंच अशा निसर्गरम्य टेकडीवर हे विठ्ठलरखुमाईचे मंदिर आहे. या ठिकाणी हा अखंड हरिनाम सप्ताह सुरु असून. वारकरी संप्रदाय मंडळ रामदास पाटील संस्थापक, आध्यात्मिक शिक्षण संस्था गुरुकुल महड यांच्या मार्गदर्शनाखाली होत असलेला सप्ताहाच्या निमित्ताने हिंदुचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचे व्याख्यांन सत्राचे अयोजन करण्यांत आले. शेकडो वारकरी, ग्रामस्थांनी यांचा लाभ घेतला.



श्री कृष्ण जन्मोत्वसाच्या निमित्त व संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या ७५० व्या जयंती सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये या ठिकाणी काकडा आरती, ज्ञानेश्वरी पारायण, पसायदान, भजन, प्रवचन, कीर्तन त्याच बरोबर जिल्ह्यातील किर्तनकार यांनी आपल्या अमृत वाणीतून वारकरी यांस मंत्र मुग्ध करीत आहे. तसेच काल्याचे कीर्तन सकाळी १० ते १२ रामदास पाटील संस्थापक, आध्यात्मिक शिक्षण संस्था गुरुकुल महड यांचे झाले यावेळी श्री कृष्ण चरित्र जागर करण्यात आला.

काल्याचा महाप्रसाद शंकर सुदाम मानकवळे (शिरवली),विजय कदम (वनवठे), राकेश जाधव, उदय शहासने यांच्या माध्यमातून देण्यात येणार आहे. विठ्ठल रूक्मिणी देवस्थान कमिटी अध्यक्ष सदानंद रघुनाथ कदम, सचिव धोंडू रघुनाथ दाभणे, सचिव केशव बुरुमकर, जनार्दन हाडप तसेच सर्व पदाधिकारी यांच्या माध्यमातून आवाहन करण्यात येत आहे.

**गौरी गणपती विशेष | पूजेसह सजावटीसाठी तेरड्याच्या फुलांना विशेष धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व**

## गौरी आगमनाची शोभा वाढवणारा तेरडा

**| रायगड | प्रतिनिधी |**

गौरी-गणपती उत्सवात सजावटीसाठी आणि पूजेसाठी विशेष मानाचे मानली जाणारी तेरड्याची फुले सध्या सर्वत्र फुलली आहेत. या फुलाचे धार्मिक तसेच सांस्कृतिक महत्त्व असल्याने गौरी आगमनात घराघरांत तेरड्याच्या फुलांना मोठी मागणी असते.

तेरडा हा साधारण ३० ते ९० सेंटीमीटर उंच वाढणारा औषधी झाडाचा प्रकार आहे. त्याची पाने साधी, दातेरी कडांची असतात तर फुले झुबक्यांनी पानांच्या बगलेत उमलतात. जांभळट, गुलाबी, तांबडी आणि पांढरी अशा रंगांत ही फुले उमलतात. पिवळ्या रंगात तेरड्याची फुले दिसत नाहीत.



या वनस्पतीची बोंडे अतिशय संवेदनशील असतात; थोडा स्पर्श होताच तडकून बिया बाहेर फेकल्या जातात, म्हणूनच या झाडाला टच-मी-नॉट असेही संबोधले जाते. गौरी आगमनात तेरड्याची फुले गौरीच्या मूर्तीभोवती, पायवाटेत, तसेच मंडप सजावटीत लावली जातात. पूजा विधीत तेरडा फुलांचा मानाचा नैवेद्य व गौरीसाठी अर्पण केला जातो. याचबरोबर काही ठिकाणी गौरीच्या डोक्यावर तेरड्याचे फुलांचे गजरे व माळा विणून ठेवण्याची परंपरा आहे.

शुभ्रता व पावित्र्याचे प्रतीक तेरड्याची फुले रंगीबेरंगी असली तरी त्यांची रचना नाजूक, मऊ आणि आकर्षक असते. लोकमान्यतेनुसार ही फुले शुभ आणि मंगलसूचक मानली जातात. म्हणून गौरीपूजेत यांचा समावेश आवश्यक धरला गेला आहे.

तेरडा हा पावसाळ्यात सहज उगवणारा झाडाचा प्रकार आहे.गौरी-गणपतीचा उत्सवही पावसाळ्यात येतो, त्यामुळे यावेळी तेरड्याची फुले विपुल प्रमाणात मिळतात.निसर्गाने या सणासाठीच जणू खास फुले उपलब्ध करून दिल्यासारखं भासतं. जुन्या काळी गावोगाव स्त्रिया तेरड्याची फुले तोडून गौरीच्या आगमनावेळी दार सजवण्यासाठी, मंडपात किंवा मूर्तीभोवती मांडण्यासाठी वापरत असत. चिरडा-तेरडा हा शब्दप्रयोग इतका प्रचलित झाला की सणाचे प्रतीक म्हणूनच तेरडा रूढ झाला. तेरड्याच्या फुलांना मंद परंतु टिकणारा दरवळ असतो. त्यामुळे पूजा-सजावटीत वातावरण अधिक पवित्र आणि प्रसन्न होतं.

गौरी आगमनात तेरडाचा उल्लेख नेहमीच केला जातो. पूजा व सजावटीत त्यांचा समावेश हा शुभ मानला जातो. त्यामुळे गौरी-गणपतीत या फुलांना खास मान मिळतो. ग्रामीण भागासोबतच शहरी बाजारपेठेतही या दिवसांत तेरड्याची मागणी वाढते.

या फुलांचे बोंडे म्हणजे शेंगा स्पर्श होताच तडकून बिया बाहेर फेकतात, म्हणून याला टच-मी-नॉट असा उल्लेखही केला जातो. औषधांमध्ये तेरड्याच्या झाडाचे विविध भाग वापरले जातात सूज, फोड, भाजल्यावर लेप म्हणून लावतात. ताप, मूळव्याध व त्वचारोगांवर उपयुक्त मानली जातात.लघुशंका साफ करण्यासाठी व शरीरातील सूज कमी करण्यासाठी वापरल्या जातात.काही ठिकाणी तेरड्याचा अर्क रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करतो, असे मानले जाते.

तेरडा हा सहज उगवणारा व रंगांनी बहारलेला फुलांचा प्रकार आहे. धार्मिक श्रद्धा, सजावटीतील शोभा आणि औषधी महत्त्व या तिन्हींच्या संगमामुळे तेरड्याला अविभाज्य स्थान लाभले आहे.

# बीपीसीएल प्रशासनाचा मुजोरपणा

## स्थानिक माथाडी कामगारांना डावलून परप्रांतियांना रोजगार

। उरण । प्रतिनिधी ।

उरण तालुक्यात विविध राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय कंपनी, प्रकल्प मोठ्या प्रमाणात कार्यरत असून, या कंपनी प्रकल्पामधून कोट्यवधींची उलाढाल होत आहे. मात्र, उरणमध्ये स्थानिक नागरिकांना विश्वासात न घेता बाहेरून आलेल्या परप्रांतीय कामगारांची मोठ्या प्रमाणात भरती अनेक कंपन्या व प्रकल्पात सुरू असल्याने स्थानिकांचा रोजगाराचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

उरण तालुक्यात भेंडखळ येथे बीपीसीएल (भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड) हा राष्ट्रीय प्रकल्प कार्यरत आहे. हा प्रकल्प राष्ट्रीय असल्याने व उरण तालुक्यात भेंडखळ येथे असल्यामुळे सदर कंपनीने नोकरीमध्ये स्थानिकांना प्राधान्य द्यायला पाहिजे होते. मात्र, सदर कंपनीला सध्या स्थानिक असलेल्या बेरोजगारांचा व कामगारांचा विसर पडला असून, दि. १५ व १५ ऑगस्ट रोजी बीपीसीएलच्या कंपनी प्रशासनाने स्थानिक असलेल्या माथाडी



कामगारांना सणानिमित्त सुट्टी दिली व याच सुट्टीच्या काळात परप्रांतीय कामगारांना कंपनीत प्रवेश देऊन त्यांना रोजगार दिला. मात्र, सुट्टीच्या दिवशी स्थानिक कामगार काम करण्यास तयार होते, पण स्थानिक माथाडी कामगारांना विश्वासात न घेता, त्यांना न कळवता सुट्टीच्या दिवशी परप्रांतीय कामगारांना रोजगार दिल्याने स्थानिक माथाडी कामगारांमध्ये प्रचंड संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. असाच प्रकार दि. १७ ऑगस्ट रोजीसुद्धा झाला आहे. बीपीसीएल प्रशासन नेहमी स्थानिक माथाडी कामगारांना डावलून परप्रांतीय कामगारांना रोजगार देत असल्याने या बीपीसीएलच्या अन्यायाच्या निषेधार्थ बीपीसीएल कंपनीत काम करणारे स्थानिक माथाडी कामगार असलेले टोळी क्रमांक २०४८ व टोळी क्रमांक ३०६८ च्या माथाडी कामगारांनी शनिवार, दि. १६ ऑगस्ट रोजी संध्याकाळी ५ वाजता बीपीसीएलच्या गेटवरच बीपीसीएल कंपनीच्या अधिकाऱ्यांना घेराव घातला.

यावेळी कामगारांनी विविध कंपनीचे अधिकाऱ्यांना याबाबत जाब विचारला असता अधिकाऱ्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली आहेत. या समस्या संदर्भात व स्थानिक माथाडी कामगारांच्या मागणी संदर्भात बिपीसीएल कंपनीचे अधिकारी अरविंद चक्रवर्ती यांच्याशी संपर्क साधला असता आम्ही कोणावरही अन्याय केला नाही. आम्ही नियमानुसार काम करीत आहोत. आमचा स्थानिक कामगारांना विरोध नाही. मी मराठी माणसाचा अपमान केला नाही, असे त्यांनी सांगितले. यासंदर्भात ॲडमिन इन्चार्ज यांच्याशी भेट घेऊन संवाद साधला असता ॲडमिन इन्चार्ज सुधीर कांबळे यांनी कोणतेही प्रतिक्रिया दिली नाही. कंपनीचे मेंटेनन्स मॅनेजर नारायण लांडे यांच्याशी संपर्क साधला असता आम्ही मेंटेनन्ससाठी आलेलो आहोत. आम्हाला इतर गोष्टीची माहिती नाही, असे त्यांनी सांगितले. कंपनीचे टर्मिनल मॅनेजर अरुण रेड्डी हे सुट्टीवर असल्यामुळे त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही.

सिक्युरिटी इन्चार्ज व्यांकाप्पा हावकोंडी यांना स्थानिक माथाडी कामगारांनी सर्वच परप्रांतीय कामगारांची ओळखपत्र, प्रवेशपत्र, माथाडी कामगार असलेले ओळखपत्र व इतर कागदपत्रे मागितली असता ते देण्यास सेक्युरिटी इन्चार्ज व्यांकाप्पा हावकोंडी यांनी नकार दिला. त्यामुळे वातावरण अधिकच तणावपूर्ण झाले होते. माथाडी कामगारांना सुट्टीच्या दिवशी किंवा इतर कोणत्याही दिवशी रोजगारात, नोकरीत प्राधान्य दिले नाही तर बीपीसीएलच्या गेटसमोरच तीव्र आंदोलन करण्याचा इशारा स्थानिक माथाडी कामगारांनी बीपीसीएल कंपनी प्रशासनाला दिला आहे.

# विनीत घरतचा फुंडे ग्रामपंचायतीतर्फे सत्कार

। उरण । प्रतिनिधी ।

उरण तालुक्यातील फुंडे गावाचा लौकिक वाढविणारा एक ऐतिहासिक क्षण १५ ऑगस्ट रोजी घडला. फुंडे गावातील विनीत प्रविण घरत यांनी चार्टर्ड अकाउंटंट परीक्षेत यश संपादन करून फुंडे गावाचा पहिला सीए होण्याचा मान मिळवला आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाचा गौरव करण्यासाठी ग्रामपंचायत फुंडे यांच्या वतीने स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात त्यांचा सत्कार



करण्यात आला.

कार्यक्रमास सरपंच सागर श्रीधर घरत, उपसरपंच चंद्रकांत म्हात्रे, ग्रामसेवक राजेंद्र सातंगे, महिला सदस्या जुईली घरत, रुविता म्हात्रे, संपदा घरत, ग्रामपंचायतीचे सर्व कर्मचारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते. सत्कार कार्यक्रमात विनीत यांना मानचिन्ह, पुष्पगुच्छ व शाल नारळ देऊन गौरविण्यात आले.

## कृषीमंत्रीपदाचा भार पेलवेना?

**मुंबई :** माणिकराव कोकाटे यांच्याकडचं कृषी खातं दत्तात्रय भरणेंकडे देण्यात आलं. तर, भरणेंकडं असणारं क्रीडा खातं कोकाटेंना सोपवलं गेलं. मात्र, दत्तात्रय भरणेंना आता कृषी खात्याचा भार सोसवेना झालाय. इंदापूरमध्ये एका कार्यक्रमात बोलताना क्रीडा व अल्पसंख्याक खात्यचं बरं होतं, लय त्रास नव्हता, असं विधान त्यांनी केलं आहे. परंतु, त्यानंतर त्यांनी आपल्या विधानावर सारवासारवही केली.


### जाहिर नोटिस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालक शशिकांत रामभाऊ खोपकर, वगैरे यांचेसोबत चालु आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिध्द करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे. आर | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| परहुरपाडा ता.अलिबाग | २७४ | ०-०८-४०<br>पो.खं ०-००-६०<br>एकुण ०-०९-०० | २.०९ |

गट नं.२७४ मधून गट नं. २८२ पर्यंत मापगाव-जलपाडा अंतर्गत रस्ता उत्तरेस व गट नं. २८२ दक्षिणेस असा ४० मी लांबी ×९ मी रूंदी एकुण ३६० मी इतके क्षेत्राचा अंतर्गत रस्ता मिळकत या वहिवाट करारनाम्याचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून होणाऱ्या १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

अलिबाग
दिनांक : १७/०८/२०२५

सही/-
**ॲड. राकेश नारायण पाटील**
रा. आगरी पॅलेस, मु. पो. चिंचोटी
ता. अलिबाग, जि. रायगड
मो.नं.९२७२६२०००५


# खड्डेमुक्त रस्त्यांसाठी १९ ऑगस्टपासून उपोषण

## पोलीस मित्र संघटनेचा पुढाकार

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील सर्व बांधकाम विभाग अखत्यारीत असलेल्या सर्व रस्त्यामध्ये खड्डयांचे साम्राज्य आहे. त्या खड्ड्यांबाबत पोलीस मित्र संघटना सातत्याने आवाज उठवत असून, सार्वजनिक बांधकाम विभाग, राज्य रस्ते विकास महामंडळ आणि जिल्हा परिषद बांधकाम विभाग यांच्या कडून कार्यवाही केली जात नाही. दरम्यान, प्रशासनाच्या असहकार यामुळे १९ ऑगस्टपासून पोलीस मित्र संघटना उपोषणाला बसणार आहे. संघटनेचे राज्य उपाध्यक्ष रमेश कदम हे उपोषण करणार आहेत.



तालुक्यात बांधकाम विभागाच्या रस्त्यावर आजही खंड्याचे साम्राज्य दिसत आहे.तर वाहन चालकांना जीव मुठीत घेऊन वाहन चालवावे लागत आहे. रस्ते दुरूस्तीअभावी आपघात झाल्यास संबंधित यंत्रणेवर जबाबदारी निश्चित करून सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात येईल, असे निर्देश दिले आहेत. तर, कर्जत खालापूर मतदार संघाचे आमदार महेंद्र थोरवे यांनी कर्जत तालुक्यातील सर्व रस्त्यामधील खड्डे भरले नाही तर कर्जतकर जनता चपलेनी मारतील असे सुनावले आहे, तरीसुद्धा बांधकाम विभाग गंभीर दखल घेतली नाही. सर्व बांधकाम विभाग अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे शासनाचा करोडो रूपये निधी वाया गेला असल्याचा पोलीस मित्र संघटनेचा आरोप आहे. अनेक रस्त्यांवर आज खड्डयांचे साम्राज्य ही काँक्रिटीकरण केलेल्या रस्त्यांवरदेखील मोठमोठ्या भेगा व खड्डे पडले आहेत. पुलावर व रस्त्याच्या बाजूला गवत, झाडेझुडपे मोठ्या प्रमाणात वाढलेली आहेत, तर रस्त्याचे दुभाजक गवतात दिसेनासे झाले आहेत. १९ ऑगस्टपासून ठिकाण छत्रपती संभाजी महाराज स्मारकासमोर पोलीस मित्र संघटनेचे राज्य उपाध्यक्ष रमेश कदम हे श्रीराम पूल कर्जत येथे उपोषणाला सुरुवात करणार आहेत.

# वीर वाजेकर महाविद्यालयात लायन्स क्लबची स्थापना



। उरण । प्रतिनिधी ।

रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर आर्ट सायन्स कॉमर्स कॉलेज महालण विभाग फुंडे येथे लायन्स क्लब वीर वाजेकर कॅम्पस या नावाने स्थापन झाला. या क्लबचा इन्स्टॉलेशन सोहळा नुकताच वीर वाजेकर महाविद्यालयाच्या सभागृहात पार पडला. प्रभारी प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर यांनी पुढाकार घेऊन महाविद्यालयात क्लबची स्थापना केली. त्याची उद्दिष्टे नमूद करून सर्व मान्यवरांचे स्वागत केले.

या सोहळ्याच्या निमित्ताने वाशी लायन्स क्लबचे लायन विजय पाटील यांनी लायन्स क्लबची स्थापना, उद्देश व विस्तार याची सविस्तर माहिती दिली. पीएमएफ जे लायन मिलिंद पाटील उलवे जेम्स क्लबचे ॲडमिनिस्ट्रेटर यांनी लायन्स क्लबची कार्यपद्धती, हाती घेतलेले उपक्रम, विविध सामाजिक व लोकोपयोगी उपक्रमांची माहिती दिली. याप्रसंगी लायन्स क्लब वीर वाजेकर कॅम्पसची नवनियुक्त अध्यक्ष लायन गार्गी आमोद ठक्कर यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात आरोग्य, पर्यावरण, सामाजिक सेवा अशा उपक्रमाबरोबरच युवकांमध्ये कॅपॅसिटी बिल्डिंग आणि करिअर गायडन्स या क्षेत्रांमध्ये सर्वांना सोबत घेऊन काम करण्याचे उद्दिष्ट व्यक्त केले. लायन मिलिंद पाटील यांनी अध्यक्ष व इतर सर्व पदाधिकाऱ्यांना त्यांच्या जबाबदाऱ्या समजावून सांगितल्या. उपाध्यक्ष म्हणून लायन प्रणाली सकपाळ, सेक्रेटरी म्हणून लायन तनिष्क थळी, मेंबरशिप चेअरमन म्हणून लायन दीपांशू तांडेल व लायन संचिता पाटील या सर्व पदाधिकाऱ्यांना बॅचेस देऊन सन्मानित करण्यात आले.

## दीड वर्षाच्या मुलासह महिला बेपत्ता

**महाड :** सासरी जाते सांगून सासरहून निघालेली विवाहित महिला शोध घेऊनही न सापडल्याने अखेर फिर्यादींनी पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवल्याची घटना महाड तालुक्यात नुकतीच घडली आहे. याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, नम्रता सुनील सुतार, २४, रा. गोवेल, ता. पोलादपूर ही विवाहिता तिचा मुलगा स्वराज सुनील सुतार, दीड वर्षे याला घेऊन ८ ऑगस्ट रोजी गेली ती परत आली नाही. अखेर तिच्या नातेवाईकांनी महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात रितसर तक्रार दिली आहे.

# खांब येथे विविध उपक्रमांचा शुभारंभ

। खांब । प्रतिनिधी ।

रोहा तालुक्यातील ग्रु.ग्रा. पंचायत खांब येथील सभागृहात स्वातंत्र्य दिनानिमित्ताने रक्तदान शिबीर व सामाजिक सुरक्षा आणि अर्थसहाय्य योजना बारकोड तसेच ई-लर्निंग या उपक्रमांचे उद्घाटन उत्साहात करण्यात आले.

सुदर्शन केमिकल कंपनीच्या सी.एस.आर. विभागाच्या प्रमुख माधुरी सणस यांच्या संकल्पनेतून आयोजित रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. एकूण ५० ग्रामस्थ व कार्यकर्त्यांनी तसेच महिलांनीही मोठ्या प्रमाणात व उत्स्फूर्तपणे सहभाग दर्शवून स्वेच्छेने रक्तदान केले. तसेच याच कार्यक्रमात



सामाजिक सुरक्षा आणि अर्थसहाय्य योजना बारकोड तसेच ई-लर्निंग या उपक्रमांचेही शुभारंभ करण्यात आले.

यावेळी कंपनीचे ओसी विभागाचे वरिष्ठ मॅनेजर सुनील देशपांडे, गोवे सरपंच महेंद्र पोटफोडे, तळवली सरपंच रविंद्र मरवडे, माजी सरपंच रामचंद्र चितळकर, प्रकाश थिटे, मनोज शिर्के, नरेंद्र जाधव, अर्जुन साळुंके, सेवानिवृत्त मुख्याध्यापक अविनाश म्हात्रे, सरपंच सुरेखा पारटे, जितेश पारटे, योगेश खामकर, उपसरपंच चंद्रकांत जाधव, दत्ता वातेरे, रंजना तवले, मानसी चितळकर, कांचन मोहिते, पो. पाटील मनोज सावरकर, ग्रामसेवक अलका बामुगडे, योगेश धामणसे, तसेच खांब पंचक्रोशीतील सर्व ग्रामस्थ, अंगणवाडी शिक्षिका, खांब रा.जि.प शाळेचे मुख्याध्यापक, उद्योजक समीर म्हात्रे, चेतन मोदी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


रेवदंडा पोलीस ठाणे गु.र.नं.८३/२०२५ भा.न्या.सं.क.३०३ (२) वै. गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल ६ ब्रास वाळूचा लिलाव मा.प्र.वर्ग न्यायदंडाधिकारी, मुरुड यांचे आदेशाने व मा.तहसीलदार, मुरुड यांचे मार्फतीने करणार आहे. तरी लिलाव घेणारे दि. २०-०८-२०२५ रोजी रेवदंडा पोलीस ठाणे, ता.अलिबाग रायगड येथे कागदपत्रासह हजर रहावे. अटी व शर्ती लागू.
संपर्क :- ८३९०२११८२६

प्र.अधि.सपोनि, रेवदंडा पो. ठाणे



परिशिष्ट-११
(प्रारुप प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिद्धी-जाहीर सूचनेचा नमुना -इंग्रजी)
**Karjat Municipal Council Dist. Raigad**
**GENERAL ELECTION 2025**
**PUBLIC NOTICE**

For the General Election of Karjat Municipal Council to be held in the Year 2025, The Programme For The Publication of draft ward boundaries is as follow :-

| | | |
|---|---|---|
| 1 | Date of publishing Notification of the draft ward boundaries | Monday, Date 18/08/2025 |
| 2 | Period of submitting objections and suggestions (To be submitted to the chief officer for objections and suggestion, in election office) | Monday Date 18/08/2025 To Sunday Date 31/08/2025 (upto 3.00 p.m.) |

Note - The Citizens Who have Filed Objections And suggestions will be informed separately about the date of hearing
Place : Karjat
Date. 18/08/2025

Sign/-
**(Tanaji chavan)**
**Chief Officer**
**Karjat Municipal Council**



परिशिष्ट-११
(प्रारुप प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिद्धी-जाहीर सूचनेचा नमुना -इंग्रजी)
**Alibag Municipal Council Dist. Raigad**
**GENERAL ELECTION 2025**
**PUBLIC NOTICE**

For the General Election Of Alibag Municipal Council to be held in the Year 2025, The Programme For The Publication of draft ward boundaries is as follow

| | | |
|---|---|---|
| 1 | Date of publishing Notification of the draft ward boundaries | Monday, Date 18/08/2025 |
| 2 | Period of submitting objections and suggestions (To be submitted to the chief officer for objections and suggestion, in election office) | Monday Date 18/08/2025 To Sunday Date 31/08/2025 (up to 3.00 pm) |

Note- The Citizens Who have Filed Objections And suggestions will be informed separately about the date of hearing
Place. Alibag
Date. 15/08/2025

Sign/-
**(Sachin Bachchhaw)**
**Chief Officer**
**Alibag Municipal Council**


# सुदर्शनचा बारकोड उपक्रम फायदेशीर : मरवडे



(छायाचित्र : नंदकुमार मरवडे)

। खांब । प्रतिनिधी ।

सुदर्शन केमिकलच्या बारकोड उपक्रमामुळे गरजू लाभार्थ्यांपर्यंत शासनाच्या योजनांचा प्रकाश पोहोचणार असल्याचे सरपंच रवींद्र मरवडे यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले.

स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने सुदर्शन केमिकल कंपनीच्या सीएसआर फाऊंडेशनच्या माध्यमातून सामाजिक सुरक्षा व अर्थसहाय्य योजनेच्या क्यूआर कोडचे उद्घाटन उत्साहात ग्रुप ग्रामपंचायत तळवली तर्फे अष्टमी येथे करण्यात आले, यावेळी ते बोलत होते.

कंपनीच्या सी.एस.आर विभाग प्रमुख माधुरी सणस यांच्या विशेष संकल्पनेतून सामाजिक सुरक्षा आणि आर्थिक सहाय्यासाठी राबविण्यात आलेल्या या प्रकल्पाचे उद्घाटन मारूती महाराज कोलटकर व कंपनी पदाधिकारी अमर चांदणे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ग्रामसेविका स्नेहा पिंपळकर, उपसरपंच हरिश्चंद्र मांगुळकर, सदस्य दयाराम मरवडे, संदीप महाडिक, निलम वाळंज, पो. पाटील गणेश महाडिक, मारूती खांडेकर, एकनाथ मरवडे, रामचंद्र बामणे, सुरेश वाघमारे, रघुनाथ कोस्तेकर, राम शेलार, वासुदेव मरवडे, मंगेश लोखंडे, अजित चितळकर, राम महाडिक, मोरेश्वर मरवडे, राम लोखंडे, सुनील महाडिक, उमेश मरवडे, इतर ग्रामपंचायत सदस्य तसेच अंगणवाडी शिक्षिका, जि.प. शाळा तळवलीचे शिक्षक व विद्यार्थी आणि ग्रुप ग्रामपंचायत तळवलीतर्फे अष्टमीचे सर्व ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विना खराडे यांनी केले.


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक


**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



**मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**



**उरण नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५**
**जाहीर सूचना**

उरण नगरपरिषद, सन २०२५ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रारूप प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिध्द करण्यासाठी आणि त्यावर हरकती व सूचना मागविण्यासाठी खालील प्रमाणे कार्यक्रम जाहीर करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | प्रभागाच्या भौगोलिक सीमा प्रसिध्दीची अधिसूचना प्रसिध्द करण्याचा दिनांक | सोमवार, दिनांक १८/०८/२०२५ |
| २. | हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी (हरकती व सूचना मुख्याधिकारी, नगरपरिषद उरण यांच्याकडे सादर कराव्यात) | सोमवार दिनांक १८/०८/२०२५ ते रविवार दिनांक ३१/०८/२०२५(दुपारी ३.०० वा पर्यंत) |

**टिप-** हरकती व सूचना दाखल करणाऱ्या नागरिकांना सुनावणीकरिता उपस्थित राहण्यासाठी स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

ठिकाण - उरण
दिनांक १८/०८/२०२५

**सही/-**
**(समीर जाधव)**
**मुख्याधिकारी**
**उरण नगरपरिषद, उरण**



**Uran Municipal Council**
**GENERAL ELECTION 2025**
**PUBLIC NOTICE**

For the General Election Of Uran Municipal Council to be held in the Year 2025, The Programme For The Publication of draft ward boundaries is as follow

| | | |
|---|---|---|
| 1 | Date of publishing Notification of the draft ward boundaries | Monday, Date 18/08/2025 |
| 2 | Period of submitting objections & suggestions (To be submitted to the chief officer Uran for objections & suggestion, in election office Uran) | Monday, Date 18/08/2025 To Sunday, Date 31/08/2025 (upto 3.00 pm) |

Note- The Citizens Who have Filed Objections & suggestions will be informed separately about the date of hearing
Place - Uran
Date. 18/08/2025

Sign/-
**(Sameer Jadhav)**
**Chief Officer**
**Uran Municipal Council, Uran**



**परिशिष्ट - १०**
**(प्रारूप प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिध्दी- जाहीर सूचनेचा नमुना- मराठी )**
**अलिबाग नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५**
**जाहीर सूचना**

अलिबाग नगरपरिषद, जि. रायगड च्या सन २०२५ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रारूप प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिध्द करण्यासाठी आणि त्यावर हरकती व सूचना मागविण्यासाठी खालील प्रमाणे कार्यक्रम जाहीर करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्रभागाच्या भौगोलिक सीमा प्रसिध्दीची अधिसूचना प्रसिध्द करण्याचा दिनांक | सोमवार, दिनांक १८/०८/२०२५ |
| २ | हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी (हरकती व सूचना मुख्याधिकारी, अलिबाग नगरपरिषद यांच्याकडे सादर कराव्यात) | सोमवार दिनांक १८/०८/२०२५ ते रविवार दिनांक ३१/०८/२०२५(दुपारी ३.०० वा पर्यंत) |

टिप- हरकती व सूचना दाखल करणाऱ्या नागरिकांनी सुनावणी करिता उपस्थित राहण्यासाठी स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.
ठिकाण - अलिबाग
दिनांक १५/०८/२०२५

**सही/-**
**(सचिन बच्छाव)**
**मुख्याधिकारी अलिबाग नगरपरिषद.**



**परिशिष्ट - १०**
**(प्रारूप प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिध्दी- जाहीर सूचनेचा नमुना- मराठी )**
**कर्जत नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५**
**जाहीर सूचना**

कर्जत नगरपरिषद, जि. रायगड च्या सन २०२५ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रारूप प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिध्द करण्यासाठी आणि त्यावर हरकती व सूचना मागविण्यासाठी खालील प्रमाणे कार्यक्रम जाहीर करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्रभागाच्या भौगोलिक सीमा प्रसिध्दीची अधिसूचना प्रसिध्द करण्याचा दिनांक | सोमवार, दिनांक १८/०८/२०२५ |
| २ | हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी (हरकती व सूचना मुख्याधिकारी, कर्जत नगरपरिषद यांच्याकडे सादर कराव्यात) | सोमवार, दिनांक १८/०८/२०२५ ते रविवार, दिनांक ३१/०८/२०२५(दुपारी ३.०० वा पर्यंत) |

टिप- हरकती व सूचना दाखल करणाऱ्या नागरिकांना सुनावणी करिता उपस्थित राहण्यासाठी स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.
ठिकाण - कर्जत
दिनांक : १८/०८/२०२५

**सही/-**
**(तानाजी चव्हाण)**
**मुख्याधिकारी कर्जत नगरपरिषद, कर्जत**


अलिबाग-शास्त्रीनगरच्या पोहरादेवी महिला गोविंदा पथकाने पाच थर लावून फोडली दहीहंडी.



# जल्लोष मानाच्या दहीहंडीचा

(छायाचित्र : समीर मालोदे)











# बीसीसीआयने बदलले देशांतर्गत क्रिकेटचे नियम

## गंभीर दुखापत झाल्यास बदली दिली जाणार ; पंत-वोक्सच्या दुखापतीनंतर बदल

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने खेळण्याच्या परिस्थितीत बदल केले आहेत आणि आगामी देशांतर्गत हंगामात दुखापतीमुळे बदली खेळाडूला परवानगी दिली आहे. जर एखाद्या खेळाडूला गंभीर दुखापत झाली असेल आणि तो पुढे सामन्यात खेळण्याच्या स्थितीत नसेल, तर त्याच्या जागी दुसऱ्या खेळाडूला संधी मिळेल. हा नियम बहु-दिवसीय देशांतर्गत सामन्यांमध्ये लागू असेल. म्हणजेच, एका दिवसापेक्षा जास्त काळ चालणाऱ्या सामन्यांमध्ये.

इंग्लंडमध्ये नुकत्याच झालेल्या अँडरसन-तेंडुलकर मालिकेत ऋषभ पंतला दुखापत झाली होती. त्यानंतर इंग्लंडचा वेगवान गोलंदाज ख्रिस वोक्सलाही दुखापत झाली. नियमांनुसार, दुखापत डोक्याला असेल तरच खेळाडूची जागा घेता येते. याला कन्कशन रिप्लेसमेंट म्हणतात. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्येही हाच नियम लागू होतो. तथापि, भारतातील स्थानिक क्रिकेटसाठी, बीसीसीआयने इतर दुखापतींमध्येही बदली करण्याची परवानगी देण्याचा निर्णय घेतला आहे.

जर एखाद्या खेळाडूला सामन्यादरम्यान गंभीर दुखापत झाली तर त्याच्या जागी बदली खेळाडूला परवानगी दिली जाऊ शकते. ही दुखापत खेळादरम्यान आणि मैदानाच्या आत झाली असावी.

या बदलाबद्दल अनेक खेळाडूंचे वेगवेगळे मत आहे. इंग्लिश कसोटी कर्णधार बेन स्टोक्सने याला विनोद म्हटले, तर गौतम गंभीरने त्याचे स्वागत केले. भारताचा ऋषभ पंत आणि इंग्लंडचा ख्रिस वोक्स या दोघांनाही चौथ्या आणि पाचव्या कसोटीत गंभीर दुखापत झाली, त्यानंतर ते सामन्यात सहभागी होऊ शकले नाहीत.

अहमदाबादमध्ये सुरू असलेल्या पंचांच्या कार्यशाळेत बीसीसीआयने नवीन खेळण्याच्या परिस्थितीबद्दल माहिती दिली. बीसीसीआयने स्पष्ट केले आहे की हा नियम पांढऱ्या चेंडूच्या क्रिकेटमध्ये लागू होणार नाही. आयपीएलमध्ये तो लागू होईल की नाही हे अद्याप निश्चित झालेले नाही. परंतु सीके नायडू ट्रॉफी मध्ये तो लागू होईल.

जर सामन्यादरम्यान एखाद्या खेळाडूला गंभीर दुखापत झाली तर त्याच्या जागी दुसरा खेळाडू दिला जाईल जर मैदानात कोणताही खेळाडू जखमी झाला तर त्याच्या जागी दुसरा खेळाडू दिला जाऊ शकतो. अशा परिस्थितीत, चेंडू लागल्याने, फ्रॅक्चरमुळे किंवा विस्थापनामुळे खेळाडूला दुखापत होऊ शकते.

दुखापत इतकी गंभीर असू शकते की तो खेळाडू सामन्यात पुढे सहभागी होऊ शकत नाही. त्यानंतर त्या खेळाडूला नवीन बदली खेळाडू दिला जाईल. मैदानावरील पंच दुखापतीचे गांभीर्य तपासतील मैदानावर उपस्थित असलेले मैदानी पंच गंभीर दुखापतीचे मूल्यांकन करतील आणि बदलीची परवानगी देतील. ते सामनाधिकारी आणि डॉक्टरांचा सल्ला घेऊ शकतात.संघ व्यवस्थापकाने सामनाधिकारींना एक फॉर्म द्यावा लागेल ज्यामध्ये हे समाविष्ट असेल.

जखमी खेळाडूचे नाव, दुखापत केव्हा आणि कशी झाली आणि तो आता खेळू शकत नाही याची पुष्टी. बदली खेळाडूचे नाव, जो समान असणे आवश्यक आहे.

नाणेफेकीच्या वेळी ज्या खेळाडूंना पर्यायी खेळाडू म्हणून निवडण्यात आले आहे त्यांच्याम धूनच बदली खेळाडू निवडले जातील. पर्यायी खेळाडूंमध्ये जर कोणताही कीपर नसेल तरच यष्टीरक्षकाला गंभीर दुखापत झाल्यास बाहेरील कीपरला परवानगी दिली जाईल. नवीन खेळाडू संघाला अन्याय्य फायदा देणार नाही असे वाटल्यासच सामनाधिकारी बदली खेळाडूला परवानगी देतील.

सामनाधिकाऱ्यांचा निर्णय अंतिम असेल, कोणत्याही संघाला अपील करण्याचा अधिकार राहणार नाही. बदली खेळाडूला जखमी खेळाडूप्रमाणेच दंड, इशारे किंवा टाइमआउट दिले जातील. बदली खेळाडूला मान्यता मिळाल्यानंतर, जखमी खेळाडू सामन्यात परत येऊ शकणार नाही. आकडेवारीमध्ये दोन्ही खेळाडू सामना खेळल्याचे मानले जाईल.



## लाइट ऑफ लाईफ ट्रस्टतर्फे
# रन फॉर एज्युकेशन मॅरेथॉन

**कर्जत** : लाइट ऑफ लाईफ ट्रस्ट तर्फे जीवन आशा कम्युनिटी सेंटर, तिवरे येथे रन फॉर एज्युकेशन मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले. अनंदो टीम, जागृती टीम व लाभार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रम यशस्वी ठरला. या उपक्रमाचे उद्घाटन रायगड मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. आशुतोष कुळकर्णी, सचिव डॉ. प्रशांत गांगल, संपादक डॉ. दिलीप सावळे, डॉ गीतांजली राव - हजारे, तसेच रोटरी क्लब ऑफ कर्जत, डिस्ट्रिक्ट ३१३१ चे पदाधिकारी रोटेरियन दीपचंद ओसवाल, माजी अध्यक्ष रोटेरियन सतीश श्रीखंडे, योगेश राठी, विशाल शाह, सचिन हजारे यांच्या उपस्थितीत होते. मॅरेथॉनची सुरुवात जीवन आशा सेंटरपासून पोसरी बसस्टँडपर्यंत हिरवा झेंडा दाखवून झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्य व्यवस्थापक गौतम कानोजे यांनी केले. दिव्यप्रज्वलन व स्वागतगीताने कार्यक्रमास सुरुवात झाली. गुलाबाच्या फुलांनी मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. हा उपक्रम शिक्षणाच्या बळकटीसाठी सामूहिक प्रयत्नांचे प्रतीक ठरला.

# मतिमंद मुलांच्या टेनिस स्पर्धेचे आयोजन

**रायगड** : नवी मुंबई स्पोर्ट्स व सामाजिक मंडळ व रायगड जिल्हा टेबल टेनिस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या नवी मुंबई व रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धेचे आयोजन शनिवारी २३ ऑगस्ट २०२५ ते रविवार २४ ऑगस्ट २०२५ या कालावधीत सिडको समाज मंदिर, दुसरा मजला, सेक्टर १८, नवीन पनवेल येथे महाराष्ट्र शासनाचा शिवछत्रपती राज्य पुरस्कार विजेते व आंतरराष्ट्रीय टेबल टेनिस प्रशिक्षक संजय सुदाम कडू यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेतील विशेष आकर्षण म्हणजे या स्पर्धेत प्रथमच मतिमंद मुलांची वेगळी टेबल टेनिस स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. सदर स्पर्धेचे उद्घाटन शनिवार २३ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ९.३० वाजता संजय सुदाम कडू यांच्या शुभहस्ते करण्यात येणार आहे.

## फ्रेंच क्वालिफायर एटमनला हरवले | विजेतेपदाच्या सामन्यात अल्काराझशी सामना

# सिनर सिनसिनाटी ओपनच्या अंतिम फेरीत

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानावर असलेल्या जॅनिक सिनरने त्याच्या २४ व्या वाढदिवशी सिनसिनाटी ओपनमध्ये शानदार विजय नोंदवला. त्याने उपांत्य फेरीत फ्रेंच पात्रता फेरीतील टेरेन्स एटमनचा ७-६, ६-२ असा पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला. आता अंतिम फेरीत, सिनरचा सामना स्पॅनिश स्टार कार्लोस अल्काराझशी होईल, ज्याने दुसऱ्या उपांत्य फेरीत अलेक्झांडर झ्वेरेव्हचा ६-४, ६-३ असा पराभव केला. आतापर्यंत सिनर आणि अल्काराज यांच्यात १३ सामने झाले आहेत. यामध्ये अल्काराजने ८ वेळा विजय मिळवला आहे तर सिनरने ५ वेळा विजय मिळवला आहे.



एटमनने फ्रिट्झ-रुएनला हरवले

संपूर्ण सामन्यात सिनरने उत्कृष्ट सर्व्हिस दिली आणि पहिल्या सेटमध्ये त्याला एकही ब्रेक पॉइंट मिळाला नाही. दुसरीकडे, एटमेनने एक स्वप्नवत स्पर्धा खेळली जिथे त्याने टेलर फ्रिट्झ आणि होल्गर रून सारख्या खेळाडूंना पराभूत करून सर्वांना आश्चर्यचकित केले. सामन्यापूर्वी, एटमेनने सिनेरला त्याच्या वाढदिवसानिमित्त पिकाचूसह एक पोकेमॉन कार्ड भेट दिले.

गेल्या महिन्यात विम्बल्डन पुरुष एकेरीत अल्काराजला हरवून सिनेरने विजेतेपद पटकावले. विम्बल्डन चॅम्पियनशिपचे पुरुष एकेरीचे विजेतेपद जिंकणारा तो पहिला इटालियन खेळाडू ठरला. या विजयासह, सिनरने अल्काराजसोबत ५ आठवड्यांचा जुना स्कोअरही बरोबरीत सोडवला. ८ जून रोजी, अल्काराजने सिनेरचा पराभव करून फ्रेंच ओपनचे विजेतेपद जिंकले. महिला गटात, एलेना रायबाकिनाने आर्यना सबालेंकाचा पराभव करून उपांत्य फेरी गाठली. तिने सबालेंकाचा ६-१, ६-४ असा पराभव केला. रायबाकिनाचा सामना इगा स्वाटेकशी होईल.

# बॉब सिम्पसन यांचे निधन

**। सिडनी । वृत्तसंस्था ।**



ऑस्ट्रेलियाचे माजी कर्णधार आणि प्रशिक्षक बॉब सिम्पसन यांचे वयाच्या ८९ व्या वर्षी सिडनी येथे निधन झाले. क्रिकेट ऑस्ट्रेलियाने १६ ऑगस्ट २०२५ रोजी त्यांच्या निधनाची अधिकृतपणे पुष्टी केली. सिम्पसन केवळ एक हुशार फलंदाज आणि एक उत्कृष्ट स्लिप फिल्डर नव्हते तर प्रशिक्षक म्हणून त्यांनी ऑस्ट्रेलियन क्रिकेटला नवीन उंचीवर नेले.

सिम्पसन यांनी १९५७ मध्ये कसोटी पदार्पण केले आणि १९७८ पर्यंत खेळत राहिले. त्यांनी एकूण ६२ कसोटी सामने खेळले, ज्यामध्ये त्यांनी ४,८६९ धावा केल्या आणि १० शतके ठोकली. १९६४ मध्ये इंग्लंडविरुद्ध ३११ ही त्यांची सर्वोत्तम धावसंख्या होती. फलंदाजीव्यतिरिक्त, ते लेग स्पिनर देखील होते आणि त्यांनी ७१ विकेट्स घेतल्या.

स्लिप फिल्डिंगमध्ये बॉब यांचा पराक्रम इतका होता की त्यांनी ११० झेल घेतले, जे अजूनही नॉन-विकेटकीपरसाठी एक विक्रम मानले जाते. त्यांनी एकूण ३९ कसोटी सामन्यांमध्ये ऑस्ट्रेलियाचे नेतृत्व केले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)